



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १२२ * नांदेड * शनिवार, दि. ९ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# दहावीतही मुलींनी मारली बाजी

## जिल्ह्याचा निकाल ८३.३२ टक्के

**नादेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या लातूर विभागांतर्गत फेब्रुवारी- मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल शुक्रवार, दि. ८ मे रोजी दुपारी ऑनलाईन (अधिकृत संकेतस्थळावर) जाहीर करण्यात आला. यात नांदेड जिल्ह्याचा निकाल ८३.६२ टक्के लागला असून या परिक्षेतही मुलींनीच बाजी मारली आहे.



यावर्षी दहावी परीक्षेसाठी जिल्ह्यातून ४८ हजार ६९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४७ हजार ३३३ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. यामध्ये १९ हजार ४१९ विद्यार्थी व २० हजार १६१ विद्यार्थिनी असे एकूण ३९ हजार ५८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. जिल्ह्याच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ८३.६२ इतकी नोंदविण्यात आली आहे.

लातूर विभागात नांदेड जिल्ह्याने तिसरे स्थान पटकावले आहे. तालुकानिहाय निकालात बिलोली तालुका ९२.२८ टक्क्यांसह अव्वल ठरला असून कंधार तालुक्याचा निकाल सर्वात कमी म्हणजे ६८.७७ टक्के लागला आहे. यंदाही मुलींनी उत्कृष्ट कामगिरी करत मुलांपेक्षा आघाडी कायम ठेवली असून मुलींची उत्तीर्णता ८८.७६ टक्के इतकी आहे.

### राज्याचा निकाल ९२.०९ टक्के

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च महिन्यात घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा (एससीसी) निकाल शुक्रवारी अधिकृतपणे जाहीर केला. यंदा राज्याचा एकूण निकाल ९२.०९ टक्के लागला असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही निकालाच्या शर्यतीत मुलींनीच बाजी मारली आहे. राज्यातील एकूण १४ लाख २० हजार ४८६ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले असून, अनेक विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

### नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय निकाल

नांदेड - ८९.५६ टक्के, अर्धापूर - ८९.९४, भोकर ८३.०९, बिलोली ९२.२८, देगलूर ८२.७२, धर्माबाद ८६.६९, हदगाव - ८४.५९, हिमायतनगर ७० ४२ कंधार- ६८.७७, किनवट- ८१, लोहा- ७९.५ माहूर- ७२.६४, मुखेड- ८७.३८, मुदखेड- ८३ नायगाव- ७८.२८ आणि उमरी ७६.३५ टक्के.

### कॉपीमुक्तीचा निकालावर परिणाम

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला दहावीच्या परीक्षेमध्ये कॉपीमुक्त अभियान राबविण्याच्या सूचना दिल्या होत्या. अनेक केंद्रावर गणित व इंग्रजी या महत्त्वाच्या पेपरच्यावेळी वेबकास्टिंग करण्यात आले होते. त्यामुळे अनेक केंद्रावरील विद्यार्थ्यांना भयमुक्त परीक्षा देता आली. ज्या ठिकाणी कॉपी करून परीक्षा देण्यात आली त्या शाळांचा निकाल कमी लागला. कॉपीमुक्तीमुळे निकालावर जरी परिणाम झाला तरी कठीण अभ्यास करून खरे विद्यार्थी यातून पुढे आले. येणाऱ्या काळातही सर्वच परीक्षा कॉपीमुक्त होणार असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले.

# अखेर थलपती विजयचे 'सरकार'स्थापन होणार!

## राज्यपालांनी दोन दिवस तिढा टाकताच बेरजेचं गणित अखेर जमवून आणलं

**चैन्नई (प्रतिनिधी)–** अभिनेता विजय यांची तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदी नियुक्ती जवळपास निश्चित झाली आहे. सूत्रांच्या दाव्यानुसार, व्हीसीके, सीपीआय आणि सीपीएम यांसारख्या लहान पक्षांनी तामिळगा वेत्री कळघम (टीव्हीके)ला पाठिंबा देण्याचे मान्य केले आहे.



दरम्यान, टीव्हीके प्रमुख विजय यांनी सलग तिसऱ्या दिवशी राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांची भेट मागितली आहे. यापूर्वी, सरकार चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या ११८ आमदारांचा पाठिंबा आणण्यास सांगून राज्यपालांनी विजय यांना दोनदा परत पाठवले होते. आता हा आकडा ११८ वर पोहोचला असल्याचा दावा केला जात आहे. टीव्हीकेकडे १०८ आमदार आहेत, सीपीआय आणि सीपीआय(एम)चे प्रत्येकी दोन, तर व्हीसीकेचे चार आमदार आहेत. काँग्रेसच्या पाच आमदारांनी आधीच आपला पाठिंबा जाहीर केला आहे.

दुसरीकडे, डीएमके आणि एआयएडीएमके यांच्या आघाडीची चर्चा आल्यानंतर टीव्हीकेने म्हटले आहे की, जर दोन्ही द्रविड पक्षांनी सरकार स्थापन करण्याचा दावा केला, तर पक्षाचे सर्व आमदार राजीनामा देतील. शुक्रवारी टीव्हीके समर्थकांनी राज्यपाल भवनासमोर निदर्शने केली आणि घोषणाबाजी केली. पोलिसांनी अनेक समर्थकांना ताब्यात घेतले.

दरम्यान, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सीपीआयचे सरचिटणीस डी. राजा यांच्याशी संवाद साधला आणि तामिळनाडूमध्ये धर्मनिरपेक्ष सरकार स्थापन करण्यासाठी टीव्हीकेला पाठिंबा देण्याचे आवाहन आपल्या पक्षाला केले, असे सूत्रांनी शुक्रवारी सांगितले. सूत्रांनी सांगितले की, खर्गे यांनी गुरुवारी राजा यांना फोन केला होता आणि भाजपला मागच्या दाराने सत्तेत येण्यापासून रोखण्यासाठी सीपीआयने त्वरित निर्णय घ्यावा, यावर जोर दिला होता. राजा यांनी असे म्हटले असल्याचे मानले जाते की, सीपीआय डीएमकेसह आपल्या स्थानिक मित्रपक्षांशी सल्लामसलत करेल आणि लवकरच निर्णय घेईल.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत टीव्हीके सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास येऊनही सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित करण्यास नकार देणारे राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांच्याविरोधात तामिळनाडू काँग्रेसने राज्यव्यापी आंदोलन सुरू केले. चेन्नईच्या अण्णा सलाई येथे आंदोलनाचे नेतृत्व करताना, एआयसीसी तामिळनाडूचे प्रभारी गिरीश चोडणकर आणि टीएनसीसीचे अध्यक्ष के. सेल्वपेरुमथगई यांनी राजभवन भाजपप्रणीत केंद्राच्या 'कठपुतळी'प्रमाणे वागत असून लोकशाही मूल्यांचे उल्लंघन करत असल्याचा आरोप केला.

# लोणी येथे दोन दुचाकींच्या धडकेत दोन तरुण ठार तर दोन जण गंभीर जखमी

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील लोणी येथील पुलावर दोन दुचाकीच्या धडकेत दोन जण ठार तर दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना दि.७ गुरूवारी रोजी रात्री ११ वाजता घडली आहे आहे.



तामसा येथून मित्रांचे लग्न आटोपून गावाकडे येत असताना अजिंक्य देविदास चाटसे (वय २५, रा.लोणी ता.अर्धापूर) तसेच अभिषेक विश्वांभर नागठाणे (वय २५, रा.तामसा ता.हदगाव) हे दोघे अर्धापूरहून तामसाकडे जात असताना दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातातील जखमींना उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी अजिंक्य देविदास चाटसे (वय २५), अभिषेक विश्वांभर नागठाणे (वय २५) यांना मृत घोषीत केले. तर त्यांच्यासोबत असलेले अन्य दोघे गंभीर जखमी आहेत. या अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी नरेंद्राचार्य महाराज रूग्णवाहिकेचे चालक राजू पाचंगे, १०८ रूग्णवाहिकाचे डॉ.आनंद शिंदे, चालक मारोती गिरी उपस्थित नागरिकांच्या मदतीने जखमींना उपचारासाठी रूग्णांना दाखल केले होते.

# नांदेड जिल्ह्याला दोन दिवसांसाठी येलो अलर्ट जारी

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दि. ८ मे २०२६ रोजी दुपारी १२:२४ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. ८ व ९ मे २०२६ या दोन दिवसांसाठी येलो अलर्ट जारी केलेला आहे.

हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# बॅनर पडल्याने तरुण गंभीर जखमी

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरामध्ये आयटीआय ते महात्मा फुले पुतळ्यापासून बस स्टॅन्डकडे येताना गुरुवारी दुपारच्या सुमारास शिवाजीनगर भागात मोठे बॅनर पडल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

नांदेडमध्ये विनापरवाना बॅनर लावण्याची चढाओढ सुरू आहे. त्यातून रस्त्यावरून येणाऱ्या जाण्याच्या जीवाची पर्वा नसल्याचा संतापजनक प्रकार घडत आहे. शहराचे विद्रुपीकरण करून सामान्य लोकांच्या जीवाशी जीवघेणा खेळ महापालिका करीत असून महापालिकेसह प्रशासन डोळेझाक करीत आहे. याकडे कोणाकडे दाद मागावी हा मुळात प्रश्न सामान्य माणसाला पडला आहे. शहरात कोणत्याही राजकीय, स्वयं घोषित सामाजिक



नेत्याचा पक्षप्रवेश, वाढदिवस असो, कुठलेही कोचिंग क्लासेसची जाहिरात असो, ही मंडळी वाट्टेल तसे बॅनर लावतात. कुणाला गंभीर दुखापत होऊ नये अशा प्रकारे काळजी घेताना दिसत नाही.

गुरूवार, दि. ७ मे रोजी शहरातील शिवाजीनगर परिसरातील बल्लेवार फर्निचर दुकानाजवळ लावलेले मोठे बॅनर कंधार येथील रहिवासी अमोल भास्करराव उमरजकर हे दुचाकीवर बसून जात असताना बॅनर अचानक त्यांच्या अंगावर पडले. यावेळी त्यांच्या डोक्याला जबर मार लागला असून आजूबाजूच्या नागरिकांनी त्यांना श्री व्यंकटेश्वरा हॉस्पिटल येथे उपचारास नेले. त्यांच्या डोक्याला ५ टाके पडले.

या घटनेत बॅनर पडून गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा जीव वाचला असला तरी उपचाराचा खर्च मनपा व बॅनर लावणारे देणार काय असा सवाल केला जात आहे. या जखमी तरुणाने शिवाजीनगर पोलीस ठाणे, मनपा यंत्रणेला ही लेखी अर्ज देऊन दोषींविरुद्ध कारवाईची मागणी केली आहे.

# नांदेड रेल्वे स्थानकाच्या विस्तारासाठी 'पिट लाईन' लवकरच मालटेकडीला!

## खा. अशोकराव चव्हाण यांनी घेतली रेल्वेमंत्री वैष्णव यांची भेट; नांदेड-लातूर नवीन रेल्वे मार्गावर लवकरच शिक्कामोर्तब होण्याची शक्यता

**नांदेड (प्रतिनिधी)–** हुजूर साहेब नांदेड रेल्वे स्थानकावरील प्रवाशांची वाढती संख्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता, येथील तीन 'पिट लाईन' जवळच असलेल्या मालटेकडी रेल्वे स्थानकावर स्थानांतरित करण्याच्या मागणीला रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. खा. अशोकराव चव्हाण यांनी या संदर्भात केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत, हा प्रस्ताव तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश रेल्वेमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.



खा. अशोकराव चव्हाण यांनी नवी दिल्ली येथे रेल्वेमंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले. रेल्वे गाड्यांची दुरुस्ती, स्वच्छता आणि तांत्रिक तपासणीसाठी आवश्यक असणारे तीन विशेष ट्रॅक अर्थात पिट लाईन सध्या नांदेड स्थानकाच्या मुख्य आवारात आहेत. या पिट लाईनवर रेल्वे गाड्या अनेक तास उभ्या असतात. या तिन्ही पिट लाईन मालटेकडी येथे हलवल्यास नांदेड स्थानकावर अतिरिक्त प्लॅटफॉर्मसाठी जागा उपलब्ध होऊ शकेल, ही बाब त्यांनी रेल्वेमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. पुढील २०-३० वर्षांतील प्रवाशांची गरज आणि नांदेड रेल्वे स्थानकाच्या सर्वांगीण विकासासाठी पिट लाईनचे स्थानांतर अनिवार्य आहे. यामुळे 'वंदे भारत' सारख्या अत्याधुनिक गाड्यांसाठी प्रगत पायाभूत सुविधा उभारणे आणि नवीन रेल्वे सेवांचे नियोजन करणे सोपे होईल, असेही चव्हाण यांनी निवेदनात नमूद केले आहे.

या बैठकीत 'नांदेड-लातूर' या नवीन रेल्वे मार्गावर लवकरच शिक्कामोर्तब होईल, असे संकेतही मिळाले आहेत. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी खा. अशोकराव चव्हाण यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला आहे. ते पालकमंत्री असताना त्यांनी 'महारेल'च्या माध्यमातून या प्रकल्पाचा प्राथमिक अभ्यास पूर्ण करून घेतला होता. त्यानंतर राज्य सरकारकडे पाठपुरावा करून या नवीन रेल्वे मार्गाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला होता. या प्रकल्पासाठी त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्यसभेत अनेकदा मागणी लावून धरली होती. काही आठवड्यांपूर्वीच रेल्वे मंत्रालयाने या मार्गासाठी सकारात्मकता दर्शवली असून, लवकरच याबाबतचा अधिकृत निर्णय जाहीर होणे अपेक्षित आहे.

# मनपाचे विद्युत उपअभियंता सतीश ढवळे तिसऱ्यांदा निलंबित

## कर्तव्यात केली कसूर, आयुक्तांचा ठपका

**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेने हाती घेतलेल्या '१०० दिवस' विशेष कार्यक्रमात कामाची गती राखण्यात अपयशी ठरलेले विद्युत विभागाचे उपअभियंता सतीश ढवळे यांच्यावर निलंबनाची कुऱ्हाड कोसळली आहे. वारंवार सूचना देऊनही कामात सुधारणा न केल्याने आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी हे कडक आदेश काढले.


नांदेड महानगरपालिकेत सत्तांतर झाल्यानंतर शहराच्या विकासासाठी १०० दिवसांचा कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला होता. यात विद्युत विभागाकडे अत्यंत महत्त्वाची कामे सोपवण्यात आली होती.

त्यामध्ये शहरातील प्रमुख चौकांमध्ये (मुथा चौक, अण्णाभाऊ साठे चौक, वर्कशॉप कॉर्नर इ.) 'एआय' आधारित स्वयंचलित सिग्नल यंत्रणा बसवणे. शहरात ठिकठिकाणी इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन उभारणे. धोकादायक विद्युत वाहिन्या भूमिगत करणे अशा कामाचा समावेश होता.

या उपक्रमातील ७० दिवसांचा कालावधी उलटूनही नियोजित कामात कोणतीही प्रगती दिसून आली नाही. आढावा बैठकीत आयुक्तांनी ढवळे यांना वारंवार समज दिली होती, मात्र त्यांच्या कार्यपद्धतीत बदल झाला नाही. यामुळे त्यांना निलंबित केले आहे.

# इंडिया आघाडीला धक्का, द्रमुकचा लोकसभेत काँग्रेससोबत बसायला नकार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इंडिया आघाडीतील महत्त्वाचा घटकपक्ष असलेल्या द्रमुकनं मोठा निर्णय घेतला आहे. द्रमुकच्या नेत्या कनिमोळी यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहून मोठी मागणी केली आहे. द्रमुकच्या या निर्णयानं इंडिया आघाडीला धक्का बसल्याचं पाहायला मिळतंय. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत द्रमुक आणि काँग्रेसनं एकत्र निवडणूक लढवली होती. मात्र, विधानसभा निवडणुकीत द्रमुकला पराभवाचा सामना करावा लागला, यानंतर काँग्रेसनं थलपती विजय यांच्या टीव्हीके पक्षाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळं द्रमुक नाराज झाल्याचं पाहायला मिळतं आहे.




# सुवेंदू अधिकारी होणार पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंमत्री; दोन उपमुख्यमंत्री असणार

**कोलकाता (प्रतिनिधी)–** सुवेंदू अधिकारी हे पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री असतील. राज्याला दोन उपमुख्यमंत्रीही असतील. रूपा गांगुली यांची उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्ती निश्चित झाली आहे. दुसरे उपमुख्यमंत्री दार्जिलिंगचे पुरुष आमदार असतील. सुवेंदू यांच्याकडे गृह मंत्रालयाचा कार्यभार असेल. गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली कोलकाता येथे होणाऱ्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीनंतर सायंकाळी शुक्रवारी ५ वाजता या तिघांच्या नावांची घोषणा केली जाईल. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री ९ मे रोजी कोलकाता येथील ब्रिगेड परेड मैदानावर शपथ घेतील. पंतप्रधान मोदी आणि शाह यांच्यासह एनडीएचे अनेक ज्येष्ठ नेते या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहतील.

सुवेंदू यांनी भवानीपूरमधून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव केला. त्यांनी नंदीग्राममधूनही सलग दुसऱ्यांदा विजय मिळवला, जिथे त्यांनी २०२१ मध्ये ममता यांचा पराभव केला होता. विधानसभा निवडणुकीत भाजपने २०७ जागा जिंकल्या. आज सकाळी विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी शाह कोलकात्यात दाखल झाले तेव्हा सुवेंदू यांनी विमानतळावर त्यांचे स्वागत केले. मुख्यमंत्री निवडण्यासाठी भाजपने शाह यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

पश्चिम बंगालमध्ये उपमुख्यमंत्रीपद गेल्या २६ वर्षांपासून रिक्त आहे. ५ नोव्हेंबर २००० पर्यंत, दिवंगत सीपीएम नेते बुद्धदेव भट्टाचार्य हे ज्योती बसू यांच्या सरकारमध्ये हे पद भूषवणारे शेवटचे नेते होते. राज्यात आतापर्यंत केवळ तीन उपमुख्यमंत्री झाले आहेत. यामध्ये ज्योती बसू, बिजय सिंग नाहर आणि बुद्धदेव भट्टाचार्य यांचा समावेश आहे. सीपीआय(एम) नेते ज्योती बसू यांनी दोनदा उपमुख्यमंत्रीपद भूषवले आहे. त्यांनी प्रथम १ मार्च १९९६७ ते २१ नोव्हेंबर १९६७ पर्यंत आणि दुसऱ्यांदा २५ फेब्रुवारी १९६९ ते१८ मार्च १९७० पर्यंत उपमुख्यमंत्री म्हणून काम पाहिले.

# अभिवक्ता संघ द्वैवार्षिक निवडणुकीसाठी शांततेत मतदान; सोमवारी मतमोजणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** अभिवक्ता संघ नांदेडच्या सन २०२६-२८ या काळासाठी शुक्रवार, दि. ८ मे रोजी सकाळी ९.०० वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडली. यामध्ये एकूण २० पदांसाठी मतदान झाले. ज्यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, महिला उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, महिला सहसचिव, कोषाध्यक्ष, विशिष्ट सहाय्यक आणि चार महिलांसह बारा सदस्य अशा एकूण २० पदांसाठी एकूण ५४ उमेदवार उभे होते. एकूण मतदार हे २५४४ होते. ॲड. अनिल व्ही. पाटील हे या निवडणुकीसाठी मुख्य निवडणूक अधिकारी होते.

या मतदानासाठी एकूण तीन बुथ बनविण्यात आले होते. पहिल्या बुथवर साडेसातशे मतदान, दुसऱ्या बुथवर साडेसातशे मतदान व तिसऱ्या बुथवर १०४४ मतदान होते. त्यामध्ये बुथ क्र. १ ला ५४० (७५० पैकी), बुथ क्र.२ ला ५२२ (७५०), आणि बुथ क्रमांक ३ वर ७२०(१०४४ पैकी) असे एकूण १,७८२ मतदान झाले. मतदान प्रक्रिया अत्यंत शांततेत व निर्विघ्न अशी पार पडली. या निवडणुकीत एकूण तीन पॅनल रिंगणात होते. समता एकता पॅनलच्या अध्यक्षपदाचे उमेदवार ॲड. शैलेश साहेबराव देशमुख, अभिवक्ता एकता पॅनलच्या अध्यक्षपदाचे उमेदवार ॲड. यदुपत श्यामसुंदर देशमुख (अर्धापूरकर) व लोकशाही पॅनलच्या अध्यक्षपदाचे उमेदवार ॲड. जगजीवन तुकाराम भेदे हे होते.

निवडणुकीची मतमोजणी सोमवार, दि. ११ मे रोजी नांदेड न्यायालयात अभिवक्ता संघाच्या हॉल क्रमांक ४० व ४४ मध्ये सकाळी नऊ वाजल्यापासून ते अंतिम निकाल येईपर्यंत चालू राहणार आहे.

मतदान शांततेत पार पाडल्याबद्दल आणि मतदान प्रक्रियेमध्ये सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल मुख्य निवडणूक अधिकारी ॲड. अनिल व्ही. पाटील, ॲड. बी. जी. मोरे, ॲड. संदीप ढगे यांनी उमेदवार, मतदान प्रतिनिधी व सर्व मतदारांचे आभार मानले आहेत. तीन निवडणूक अधिकारी आणि २४ निवडणूक सहाय्यक वकील यांनी याकामी सहाय्य नोंदविले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकल जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# पाकिस्तान व चीनवर भारताची 'नजर'

भारताच्या अंतराळ क्षेत्राने गेल्या काही दशकांत अभूतपूर्व प्रगती साधली आहे; मात्र या प्रवासाला आता एक नवे वळण मिळत आहे ते म्हणजे खासगी क्षेत्राच्या वाढत्या सहभागाचे. 'दृष्टी' या उपग्रहाच्या यशस्वी प्रक्षेपणाने हा बदल केवळ अधोरेखितच झाला नाही, तर भारताच्या धोरणात्मक स्वावलंबनाच्या दिशेने एक मोठी झेपही घेतली आहे. बंगळूरस्थित गॅलेक्सआय या स्टार्टअपने विकसित केलेला 'दृष्टी' उपग्रह केवळ एक तांत्रिक यश नाही, तर तो भारताच्या सुरक्षाव्यवस्थेतील 'तिसरा डोळा' ठरणार आहे. सीमावर्ती भागांतील हालचालींवर लक्ष ठेवणे, दहशतवादविरोधी मोहिमा अधिक प्रभावी करणे, तसेच शेजारी देशांवरील रणनीतिक नजर ठेवणे, या सर्व बाबींमध्ये या उपग्रहाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. विशेषतः पाकिस्तान आणि चीनसारख्या संवेदनशील सीमारेषा असलेल्या देशांसाठी अशी प्रगत निरीक्षण क्षमता अत्यंत आवश्यक आहे. 'दृष्टी'ची सर्वात महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणजे प्रतिकूल हवामानात, दाट ढगांमधून किंवा अंधारातही, स्पष्ट छायाचित्रे घेण्याची क्षमता. ही क्षमता पारंपरिक उपग्रहांपेक्षा खूपच प्रगत आहे. यामुळे लष्करी कारवायांमध्ये अचूक माहिती मिळवणे अधिक सुलभ होईल. यापूर्वी अशा प्रकारच्या उच्च-गुणवत्तेच्या प्रतिमा मिळवण्यासाठी भारताला परदेशी व्यावसायिक उपग्रहांवर अवलंबून राहावे लागायचे. 'ऑपरेशन सिंदूर'सारख्या घटनांमध्ये याचा अनुभव आला होता. अशा वेळी स्वदेशी उपाययोजना नसल्याने माहिती मिळवण्यात विलंब किंवा मर्यादा निर्माण होत होत्या. 'दृष्टी'मुळे ही उणीव मोठ्या प्रमाणात भरून निघणार आहे. मात्र 'दृष्टी'चा उपयोग केवळ संरक्षणापुरता मर्यादित नाही. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने हा उपग्रह अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. पूर, भूकंप, चक्रीवादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळी त्वरित आणि अचूक माहिती मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. 'दृष्टी'च्या मदतीने प्रभावित भागांची तात्काळ छायाचित्रे मिळू शकतील, ज्यामुळे मदत आणि बचावकार्य अधिक वेगाने आणि प्रभावीपणे करता येईल. कृषी क्षेत्रातही या उपग्रहाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. पिकांची स्थिती, पाण्याचा वापर, जमिनीची गुणवत्ता यांचे निरीक्षण करून शेतकऱ्यांना योग्य सल्ला देता येईल. तसेच विमा क्षेत्रात नुकसानाचे अचूक मूल्यमापन करण्यासाठीही 'दृष्टी' महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर आणि योग्य भरपाई मिळण्यास मदत होईल. या यशामागे खासगी क्षेत्राची भूमिका विशेष उल्लेखनीय आहे. आजपर्यंत भारताच्या अंतराळ मोहिमांमध्ये इस्रोसारख्या सरकारी संस्थांचा मोठा वाटा होता. मात्र 'दृष्टी'सारख्या प्रकल्पांमुळे खासगी कंपन्यांची क्षमता आणि नावीन्यपूर्ण दृष्टिकोन अधोरेखित झाला आहे. गॅलेक्सआयसारख्या स्टार्टअपने १९० किलोग्रॅम वजनाचा, उच्च-रिझोल्यूशन देणारा उपग्रह तयार करणे ही मोठी बाब आहे. यामुळे 'स्टार्टअप इंडिया'सारख्या उपक्रमांना नवे बळ मिळणार आहे. स्पेसएक्सच्या फाल्कन ९ रॉकेटद्वारे कॅलिफोर्नियातून झालेले प्रक्षेपण हे जागतिक सहकार्याचेही उदाहरण आहे. भारतातील तंत्रज्ञान आणि अमेरिकेतील प्रक्षेपण सुविधा यांचा संगम म्हणजे आधुनिक अंतराळ क्षेत्रातील परस्परावलंबित्वाचे द्योतक आहे. मात्र याच वेळी, भविष्यात भारताने स्वतःच्या प्रक्षेपण क्षमतेला अधिक बळकट करण्याची गरजही अधोरेखित होते. 'दृष्टी' हा उपग्रह भारताच्या अंतराळ प्रवासातील केवळ एक टप्पा नाही, तर तो भविष्यातील दिशादर्शक आहे. सुरक्षा, विकास आणि तंत्रज्ञान या तिन्ही क्षेत्रांमध्ये त्याचा प्रभाव जाणवणार आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, तो भारतीय तरुणांच्या कल्पकतेचा आणि नवोन्मेषाच्या ध्यासाचे प्रतीक आहे. आजच्या जागतिक स्पर्धेच्या युगात केवळ तंत्रज्ञान विकसित करणे पुरेसे नाही, तर त्यात स्वावलंबन आणि धोरणात्मक विचार आवश्यक आहे. 'दृष्टी'ने हे दोन्ही घटक साध्य केले आहेत. त्यामुळेच हा उपग्रह केवळ आकाशात झेपावलेला नाही, तर भारताच्या आत्मविश्वासालाही नवी उंची देणारा ठरला आहे. आता गरज आहे ती अशा उपक्रमांना सातत्याने पाठबळ देण्याची. सरकार, खासगी क्षेत्र आणि संशोधन संस्था यांच्यातील सहकार्य अधिक मजबूत झाले, तर भारत अंतराळ क्षेत्रात केवळ सहभागी नव्हे, तर नेतृत्व करणारा देश ठरू शकतो. 'दृष्टी' ही त्या दिशेने टाकलेली ठोस पाऊलवाट आहे.

# राणी दुर्गावती : प्रशासन कौशल्य आणि बलिदानाची अद्वितीय गाथा







मानव इतिहासाच्या प्रवाहात युद्धे, सत्ता आणि संघर्ष यांची नोंद मोठ्या प्रमाणावर आढळते; परंतु या इतिहासाच्या पानांवर स्त्रियांनी कोरलेली शौर्यगाथाही तितकीच प्रभावी आहे. अनेकदा स्त्रियांना केवळ कुटुंबाच्या चौकटीत पाहिले गेले, तरी प्रत्यक्षात त्यांनी संकटकाळात नेतृत्वाची धुरा सांभाळत समाज आणि राज्याचे रक्षण केले आहे. त्यांच्या धैर्य, जिद्द आणि कर्तृत्वामुळे इतिहास अधिक समृद्ध आणि प्रेरणादायी झाला आहे. प्राचीन आणि मध्ययुगीन काळात राजकीय अस्थिरता, परकीय आक्रमणे आणि अंतर्गत संघर्ष या पार्श्वभूमीवर अनेक स्त्रिया पुढे आल्या. त्यांनी केवळ रणांगणात शस्त्र उचलले नाही, तर प्रशासन, कुटनीती आणि समाजरचना यांतही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्यातून स्त्री ही केवळ सहनशीलतेचे प्रतीक नसून, संकटांना सामोरे जाणारी आणि परिस्थिती बदलणारी शक्ती आहे, हे स्पष्ट होते. या परंपरेतून उभ्या राहिलेल्या पराक्रमी स्त्रियांनी आपल्या स्वाभिमानासाठी आणि राज्याच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती दिली. त्यांचे जीवनकार्य हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजच्या पिढीसाठीही प्रेरणादायी ठरते. अशाच धैर्यशाली आणि कर्तृत्ववान स्त्रियांच्या मालिकेत राणी दुर्गावती यांचे स्थान विशेष उल्लेखनीय आहे.

राणी दुर्गावती या मध्य भारताच्या इतिहासातील एक पराक्रमी, दूरदृष्टी असलेल्या आणि स्वाभिमानी शासक म्हणून ओळखल्या जातात. त्यांचा जन्म ५ ऑक्टोबर १५२४ रोजी चंडेल राजघराण्यात झाला. त्या जन्माने गोंड नव्हत्या, परंतु गोंड राजघराण्यात विवाह झाल्यामुळे त्या गोंडवाना साम्राज्याच्या राणी बनल्या. त्यांचे जीवनकार्य हे केवळ एका राज्याच्या कारभारापुरते मर्यादित नसून, परकीय आक्रमणाविरुद्ध उभ्या राहिलेल्या स्त्रीशक्तीचे तेजस्वी उदाहरण आहे.

दुर्गावती या चंडेल वंशातील राजकन्या होत्या. त्यांच्या वडिलांचे नाव शालिवाहन (किंवा सालभान) असे होते. त्या महोबा परिसरातील राजघराण्यात वाढल्या. त्यांच्या सौंदर्य, शौर्य आणि बुद्धिमत्तेच्या कथा त्या काळात प्रसिद्ध होत्या. लोककथांनुसार, गढा-कटंगाचा राजकुमार दलपत शाह यांच्याशी त्यांची भेट झाली आणि दोघे एकमेकांच्या प्रेमात पडले. विविध आख्यायिकांनुसार त्यांचा विवाह स्वयंवर, युद्ध किंवा पळवून नेण्याच्या प्रकारांद्वारे झाला असे सांगितले जाते. अखेरीस त्यांचा विवाह दलपत शाह यांच्याशी झाला आणि त्या गोंडवाना राज्याच्या राणी बनल्या.

१५४५ मध्ये त्यांना वीर नारायण नावाचा पुत्र झाला. १५५० मध्ये दलपत शाह यांचे निधन झाले, तेव्हा वीर नारायण केवळ पाच वर्षांचा होता. त्यामुळे राणी दुर्गावती यांनी राजमाता म्हणून राज्यकारभार हाती घेतला. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अत्यंत कुशलतेने प्रशासन चालवले. दिवाण अधर कायस्थ आणि मंत्री मान ठाकूर यांच्या मदतीने त्यांनी राज्यात शांतता, सुव्यवस्था आणि व्यापारवृद्धी साधली. त्यांनी सिंगोरगड येथून राजधानी चौरागड येथे हलवली, जो सातपुडा पर्वतरांगांतील एक सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा किल्ला होता. त्यांच्या प्रशासनात विकेंद्रित व्यवस्था होती. स्थानिक सरदार व जागीरदार यांच्यावर काही भागाचा कारभार सोपवलेला होता. या व्यवस्थेमुळे स्थानिक पातळीवर नियंत्रण सुलभ झाले, परंतु युद्धकाळात याच गोष्टी काही प्रमाणात अडचणी ठरल्या. राणी दुर्गावती यांनी आपल्या राज्याचे संरक्षण करण्यासाठी अनेक लढाया केल्या.

माळव्याचा शासक बाझ बहादूर याने केलेले आक्रमण त्यांनी परतवून लावले आणि आपल्या पराक्रमाची छाप पाडली. नंतर मुघल सम्राट अकबर याच्या कारकिर्दीत, त्याचा सेनापती आसफ खान याने गोंडवाना राज्यावर आक्रमण केले. राणीला शत्रूची ताकद माहीत असूनही त्यांनी शरणागती पत्करली नाही. अपमानाने जगण्यापेक्षा सन्मानाने मरण हे त्यांचे ब्रीद होते.नरराईच्या घाटात झालेल्या लढाईत त्यांनी अत्यंत धैर्याने सैन्याचे नेतृत्व केले. त्यांचा मुलगा वीर नारायणही शूरपणे लढला. सुरुवातीला त्यांनी मुघल सैन्याला जोरदार प्रतिकार केला, परंतु शत्रूची संख्या व आधुनिक शस्त्रे यामुळे परिस्थिती कठीण झाली. लढाईदरम्यान राणी गंभीर जखमी झाल्या. पराभव अटळ असल्याचे लक्षात येताच त्यांनी शत्रूच्या हाती पडण्यापेक्षा आत्मबलिदान करण्याचा निर्णय घेतला. २४ जून १५६४ रोजी त्यांनी स्वतःच्या खंजीराने प्राणार्पण केले. हा दिवस आजही बलिदान दिवस म्हणून स्मरणात ठेवला जातो.

राणी दुर्गावती यांचे स्मरण आजही विविध स्वरूपात जपले गेले आहे. जबलपूर येथील राणी दुर्गावती विद्यापीठ त्यांच्या नावाने ओळखले जाते. भारत सरकारने त्यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीटही जारी केले आहे. तसेच, त्यांच्या नावाने रेल्वेगाडी दुर्गावती एक्सप्रेस आणि भारतीय तटरक्षक दलाचे जहाज ICGS राणी दुर्गावती कार्यान्वित करण्यात आले आहे.

राणी दुर्गावती यांचे जीवन हे शौर्य, स्वाभिमान आणि कर्तव्यनिष्ठेचे प्रतीक आहे. त्यांनी स्त्री नेतृत्वाचे प्रभावी उदाहरण घालून दिले. त्यांच्या कार्यामुळे त्या केवळ गोंडवाना राज्याच्या नव्हे, तर संपूर्ण भारतीय इतिहासातील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरतात. त्यांचे बलिदान आणि पराक्रम पुढील पिढ्यांना धैर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाची प्रेरणा देत राहतील.

**-डॉ. दीपाली पांडे देशमुख**
संगीत विभाग
पु. अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय
राणी सावरगाव

# आधुनिक भगीरथ : कर्मवीर भाऊराव पाटील



बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज पुण्यतिथी. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्यामनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते.

कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले. तिथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्गना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावात दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते.

बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या.

१९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, (२७ मुलींसाठी) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, (१ मुलींसाठी) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डी. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची पुण्यतिथी. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

**-श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# कमी बुद्ध्यांक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे काय?

ज्याचा बुद्ध्यांक हा अतिशय कमी आहे अशी मुलं शिक्षणात कमी पडतात. अशा मुलांना शिकवतो म्हटल्यास तारेवरची कसरत असते. अशावेळेस त्या शिक्षकांना त्या मुलांना शिकविण्यासाठी फार मेहनत घ्यावी लागते. ती बुद्धीची कसरतच असते शिक्षकांची. शिक्षक मुलांसाठी अपार मेहनत करीतच असतात. पण अशी अपार मेहनत करणारी शिक्षक मंडळी काही जास्त प्रमाणात नसतात. त्यांची संख्या फार कमी असते.

शिक्षक मेहनत घेतात यात काही वावगं नाही. परंतु काही काही अशाही शाळा आहेत की, ज्या शाळेत मुलांना शिकवायचे असल्यास आधी त्यांच्या आईवडिलांची पात्रता परीक्षा घेतली जाते. ती पात्रता परीक्षा पैशाची नसते. तर तो पालक किती शिकलेला आहे? त्याला इंग्रजी वाचता येतं का? तो मुलांना शिकवण्या लावू शकेल काय? यासाठी असते. शिकवण्या लावू शकेल काय? तो पालक किती शिकलेला आहे? त्याला इंग्रजी वाचता येते काय? हे प्रश्न कशासाठी? तर आम्हाला शाळेत जास्त मेहनत घ्यावी लागू नये यासाठी. पालकांना वारंवार सांगता यावं की, त्यानं आपल्या मुलांना तो शिकलेला असल्यानं शिकवावं. जर त्याला तसं शिकवता येत नसेल तर त्याच्या मुलाला काढून टाकणार शाळेतून यासाठी त्या पालकांचं शिक्षण हवं. दुसरा मुद्दा हा की, त्या पालकाला इंग्रजी यावं. कारण अलीकडे स्पर्धेचा काळ. अशा काळात जर त्या पालकाला इंग्रजीचं ज्ञान नसेल तर तो पालक आपल्या मुलांची इंग्रजी कशी काय हाताळू शकेल? हा प्रश्न शाळा प्रशासनाला पडतो. म्हणूनच ते त्या पालकाला इंग्रजी येणं पाहतात. तसाच तिसरा मुद्दा आहे, तो म्हणजे त्या पालकानं त्या मुलांची स्वतःच शिकवणी लावायची सोय उपलब्ध करावी. का? तर तो मुलगा अभ्यासात आणि शिक्षणात मागे पडू नये. हा झाला अलीकडच्या शाळेतील व्यवहार. आता शिकवणी वर्गाचं सांगतो. शिकवणी वर्गाचं सांगत असतांना एकदा जो फोन आला अकॅडमीकडून त्याचा उल्लेख करणं गरजेचं समजतो.

हॅलो. हं, बोला. मी अमूक अमूक अकॅडमीकडून बोलतेय. तसं अकॅडमीकडे बोलायला मुलीच असतात. कारण मुलींचा आवाज ऐकू आला की चांगली चांगली पुरुषमंडळी पिघळतात व न करणारं कार्यही करु पाहतात. म्हणून खास करुन अकॅडमीनं ग्राहक खेचण्यासाठी केलेली स्पेशल सोय. आपली मुलगी दहावीत आहे ना. होय. मग? आमची अमूक अमूक अकॅडमी आहे. शिकवणी लावायची असेल तर सांगा? तिचा प्रश्न. ते ऐकून मी तिची फिरकी घेण्यासाठी केलेलं बोलणं. सध्या नववीतच आहे. पास व्हायची आहे. पास झाल्यावर सांगेन. अहो, सगळी मुलं पासच होतात. हुशार आहे ना. नाही. हुशार नाही. त्यामुळंच तर म्हटलं की पास झाल्यावर सांगेन. अन् मला सांगा आतापासूनच शिकवणी का बरं लावायची? पास झाल्यावर पाहू ना. अहो, इंटरव्ह्यू घ्यावा लागतो. कोणाचा? कोणाचा म्हणजे? आपला. आपण किती शिकले आहात ते पाहावं लागेल की नाही. का बरं? आपली मुलगी मेरीटला आणायची असेल तर ते पाहावं लागेल की नाही?

हे बघा, माझी मुलगी तेवढी हुशार नाही व मिही जास्त शिकलेला नाही व माझी पत्नीही. हं, पैसे लावू शकतो मी. परंतु निकाल लागल्यावरच. चालेल का? मलाही वाटतं की माझी मुलगी मेरीटला यावी. बोला येईल का? नाही येणार. का बरं? अहो, मुलगी तेवढी हुशार पाहिजे. त्याचबरोबर तिचे मायबाप. तिचे मायबाप दहावी असून चालत नाही. ते कमीतकमी एमएस्सी, बीएस्सी तरी पाहिजेत. हो का? नाही बा. आम्ही तेवढे शिकलेलो नाही. बरं मग ठीक आहे. ही अकॅडमी तुमच्या काही कामाची नाही. म्हणजे? मी आणू का पास झाल्यावर मुलीला आपल्या अकॅडमीत? नाही, मुळीच नाही. का बरं? मी त्याचं कारण विचारत असतांनाच त्या मुलीनं फोन कापला. मी थोडासा फिरकी घेण्यासाठीच बोललो. परंतु माझं ते बोलणं ऐकताच त्या मुलीला समजलं की हे पालक काही जास्त शिकलेले नाहीत व यांची मुलगीही जास्त हुशार नाही. तेव्हा यांच्या मुलीवर कोण मेहनत घेणार?

या शिकवणी वर्गातून नेहमीच घडून येणाऱ्या गोष्टी. अलीकडील मेरीट आणणाऱ्या शिकवणी वर्गात गरिबांची व कमी शिकलेल्या लोकांची मुलं दिसत नाहीत. तसंच अलीकडे मेरीट येणाऱ्या शाळेतही गरिबांची व कमी शिकलेल्या लोकांची मुलं दिसत नाहीत. परंतु मुलं मेरीटला आल्यास त्यांचंच नाव होतं. अशा शाळेतून आणखी मुलं मेरीटला यावीत. म्हणून या मेधावी मुलांचा सत्कार केला जातो. अशा शाळांना देणग्याही दिल्या जातात. परंतु ज्या शाळेत गरिबांची मुलं आहेत. निरक्षरांची मुलं आहेत. ज्या मुलांना शिकवायचे म्हटल्यास तारेवरची कसरत आहे. अशी मुलं अशा गरिबांच्या शाळेतून कमीतकमी साठ टक्केपर्यंत जाणे म्हणजे तारेवरची कसरतच असते. त्यांचे साठ टक्के गुण म्हणजे त्यांचं मेरीटच असतं. परंतु त्यांची कोण दखल घेतं? कोणीच नाही. याबाबत मी सांगतांना एवढंच म्हणेल की एखाद्या रोपट्याला पुरेशी त्यांची वाढ होण्यासाठी पुरेसं वातावरण दिलं तर त्यांची वाढ चांगली होणार. याउलट एखादं रोपटं अवर्षणात जगत असेल तर, तर त्या रोपट्याची वाढ होईल काय? मुळातच होणार नाही किंवा एखाद्या मुलाला चांगलं खायला प्यायला, दिल्यास तो मुलगा धष्टपुष्ट दिसेल अन् नाही दिल्यास तो धष्टपुष्ट दिसेल काय? नाही दिसणार. तेच गणित असतं मेधावी मुलात. मुलांना अभ्यासासाठी पोषक वातावरण मिळालं की ती मेरीटला येणारच आणि नाही मिळालं तर ती मेरीटला येणारच नाहीत.

आज अशा बऱ्याच शाळा आणि शिकवणी वर्ग आहेत की जे पालकांचं इंग्रजीचं ज्ञान पाहतात. त्यातच ते किती शिकलेले आहेत तेही पाहतात आणि मुलगा जर अभ्यासात कमजोर आढळल्यास पालकांनाच वेठीस धरतात. शेवटी असे पालक नाईलाजानं शिकवण्या लावून देतात. सोबतच शिकवणी वर्गातील व शाळेतील अभ्यास स्वतः आपल्या पाल्यांकडून घरी करवून घेतात. मग ती मुलं मेरीटला येणार नाही तर काय? मेहनत पालकांची असते व नाव शाळेचं आणि शिकवणी वर्गाचं होतं. का अशा शाळा एखाद्या झोपडपट्टीतील गरिबांच्या मुलाला शाळेत प्रवेश देवून मेरीटला आणू शकत नाहीत? का असे शिकवणी वर्ग ग्रामीण भागातील एखाद्या गरिबाच्या मुलाला दत्तक घेवून मेरीटला आणत नाहीत? परंतु ते तसे करीत नाहीत. मुलं मेरीटला येतात. कारण त्यांना सगळं आयतं मिळतं. आयतं म्हणजे हुशार मुलं आणि हुशार पालक. तसंच श्रीमंत पालक आणि श्रीमंत मुलं. सगळं पोषक वातावरण.

बुद्ध्यांक कमी असलेली आणि विशेषतः ग्रामीण भागातील मुलांना चांगलं शिक्षण मिळावं यासाठी आजच्या काळात कोणी वाली नाही. त्यांनी शिकावं यासाठी शासन वेगवेगळ्या योजना राबवत असतांना दिसतं. परंतु ती मुलं शिकतील तेव्हा ना. तिही मुलं शिकू शकतात. त्यांना तसं वातावरण मिळालं तर...परंतु तसं वातावरण आजच्या शाळा व शिक्षक द्यायला तयार नाहीत. ते स्वतःच पालकांना सांगतात. शिकवणी लावून द्या. तेही एवढं शिकविण्याचं वेतन मिळत असतांना. अन् शिकवणी वर्गही पालकांकडून तीच अपेक्षा ठेवतात. शिकवलेलं पालकानं पुन्हा घरी शिकवावं. जर तो पालक निरक्षरपणानं घरी शिकवायला तयार नसल्यास अशा पालकांची मुलं शिकवण्या लावूनही मागं पडतात. ती मेरीटला येणं दूरच. ती साध्या सोप्या पद्धतीच्या असलेल्या परीक्षेतही पास होत नाही. आज मुलं कसेतरी आठवीपर्यंत तरी शिकतात. कारण मुलांना आठवीपर्यंत नापास करता येत नाही म्हणून. जर ह्याच ठिकाणी मुलांना पास होण्याची संधी नसती तर, अशी मुलं ही पहिली दुसरीच्या पुढे गेलीच नसती. हे तेवढंच सत्य आहे. यावरून बुद्धू मुलांचा वाली कोण? हा प्रश्न निर्माण झाला आहे. बुद्धू मुलं मायबाप म्हणतात म्हणून शाळेत येतात. कशीतरी शाळा सुटेपर्यंत बसतात. सुट्टी झाली की घरी जातात. दप्तर फेकतात व निव्वळ खेळतात. मायबाप जेव्हा कामावरुन घरी येतात. तेव्हा ती झोपेच्या आहारी गेलेली असतात. सकाळीही कामावर जायच्या घाईनं मायबाप त्यांचा अभ्यास करवून घेवू शकत नाहीत. अशी मुलं अभ्यासात मागे पडतात. कारण ना त्यांचा अभ्यास मायबाप करवून घेत, ना शाळेतून शिक्षक करवून घेत. मग ती अभ्यासात मागे पडणारच. शेवटी ती मुलं अशी मागे पडतात की, ती कशीबशी आठवीपर्यंत तर शिकतात आणि आठवीनंतर शाळा सोडतात. काही काही मुलं कशीतरी शालान्तपर्यंत जातात. मग नापास होतात. ती मुलं नापास झाली की, अगदी अल्प वयातच कामाला लागतात व जीवनभर वेठमजूर म्हणून जीवन घालवीत असतात. त्यानंतर त्यांची संततीही तशीच अल्प शिकून तिही वेठमजूरच बनतात. ही वास्तविकता आहे. त्यामुळंच बुद्ध्यांक कमी असलेल्या मुलांचा वाली कोण? हा प्रश्न युगानुयुगे पडणारच आहे. केवळ आणि केवळ शिक्षकांमुळे. शिक्षकच या बुद्धू मुलांना न्याय देवू शकतो. परंतु तो तरी काय करणार? तोही विवश आहे.

अलीकडे शासन जरी आठवीपर्यंत नापास करु नये हे धोरण राबवीत असलं तरी कामं एवढी वाढवली आहेत की शिक्षकांना ती कामं करावी लागतातच. या व्यतिरिक्त ऑनलाईन कामंही वाढवली आहेत. त्यातच शाळेत अशी ऑनलाईन कामं करायला बाबू नाही. त्यामुळंच शिक्षकांची तारांबळ उडते. ते सतत ऑनलाईन कामात व्यस्त असतात. मग अशावेळेस विद्यार्थ्यांच्या शिकवण्याकडे दुर्लक्ष होते व ज्यातून बुद्धू मुलांचं नुकसान होत असतं. हेही तेवढंच खरं आहे. त्यामुळंच सरकारनं यावर उपाय म्हणून ज्या ठिकाणाहून देशाचं भवितव्य घडतं. त्या प्रत्येक शाळेत ऑनलाईन कामं करण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या हितासाठी एकतरी बाबू द्यावा. म्हणजे बुद्धू विद्यार्थ्यांचीही गळचेपी होणार नाही व शिक्षकांनाही मुलं का शिकवली नाही म्हणून बहाणा सापडणार नाही. तेही चांगले विद्यार्थी घडवतील. विद्यार्थ्यांवर चांगली मेहनत घेतील नव्हे तर त्यानंतर बुद्धू मुलंही शाळेत दिसणार नाही. तसेच कोणत्याही विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना पालकांचा इंटरव्ह्यू घेवून प्रवेश नसावा. तसे आढळल्यास अशा शाळेवर कार्यवाहीची सोय असावी. जेणेकरुन चांगल्या शाळेतही बुद्धू मुलांना शिकता येईल. प्रत्येक शाळेत केवळ आणि केवळ हुशारच विद्यार्थ्यांचाच विचार होवू नये तर बुद्धू विद्यार्थ्यांचाही विचार व्हावा हे तेवढंच खरं. मग कोणावरही बुद्धू विद्यार्थ्यांचा वाली कोण? हे म्हणण्याची वेळ येणार नाही व कोणताच बुद्धू विद्यार्थीही दिसणार नाही अन् दिसलाच तर ते शिक्षक कार्यवाहीस पात्र असतील यात शंका नाही.

**अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# अर्धापूर महसूल मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर संपन्न

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** शासनाच्या वतीने अर्धापूर महसूल मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर तहसील कार्यालयाच्या प्रांगणात उत्साहात पार पडले.



या शिबिरास प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) प्रियंका पवार – कर्डिले, उपजिल्हाधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार रेणुकादास देवणीकर, महावितरणचे पंकज देशमुख, नांदेड कृऊबासचे संचालक निळकंठराव मदने, सहायक पोलीस निरीक्षक चित्तरंजन ढेमकेवाड, तालुका आरोग्य अधिकारी श्रीकांत देसाई, जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, उपजिल्हा प्रमुख दत्ता पाटील, चिटणीस रामराव भालेराव, सरचिटणीस अवधूत कदम यांच्यासह पंचायत समिती, कृषी, आरोग्य, सहकार, पुरवठा, महिला व बालकल्याण, समाजकल्याण, निवडणूक, दुय्यम निबंधक, भूमी अभिलेख, महावितरण, पशुसंवर्धन आदी विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील विविध सुधारणांबाबत तसेच मुखमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना, डिजिटल ७/१२ च्या वैधतेबाबत, भोगवटदार वर्ग – २ ची जमीन वर्ग –१ करणे बाबतच्या तरतुदीसंबंधी मार्गदर्शन तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांनी केले. समन्वय अधिकारी प्रियंका पवार यांनी यावेळी सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी दैनंदिन कामकाज समन्वयाने पार पाडावे व आपल्या विभागाशी संबंधित नसलेल्या विषयासंबंधी देखील शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांचे समाधान करावे अशी सूचना केली. तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी समाधान शिबिराच्या माध्यमातून आपल्या समस्या सोडवून घ्याव्यात, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष सहाय योजनेतील ११ लाभार्थ्यांना लाभ मंजुरी आदेश, मंडळातील एकूण ३२ प्रलंबित फेरफार निकाली काढण्यात आले. जिवंत ७/१२ मोहीम अंतर्गत ८८ सातबारा व होल्डिंग, विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे ५१ दाखले, ७९ शिधापत्रिका, मोजणी नकाशा १, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र ४०, नगरपंचायतीचे नमुना नंबर ४३, विवाह प्रमाणपत्र २, नगर पंचायतच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत १६ लाभार्थ्यांना बांधकाम परवाने, वाटप करण्यात आले. तसेच या ठिकाणी एक खिडकी योजनेत विविध विभागांशी संबंधित ९ अर्ज, चाभरा सज्जा अंतर्गत शिधापत्रिकेबाबत हदगाव पुरवठा विभागाशी संबंधित एकूण २१० अर्ज स्वीकारण्यात येऊन ते हदगाव येथे वर्ग करण्यात आले.शेतकरी व विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच विविध योजनांचा लाभार्थ्यांना प्रतिसाद मिळाला.

यावेळी डॉ. विशाल लंगडे, डॉ. राजेश बाजगिरे, चेअरमन माधवराव शिंदे, भाजयुमोचे विठ्ठल काकडे, संतोष पवार, उमाकांत सरोदे, चंद्रमुनी लोणे, नदीम मिस्त्री, कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नायब तहसीलदार आर. डी. शिंदे, मंडळ अधिकारी नवीनकुमार रेड्डी, ग्राम महसूल अधिकारी किरण मोरे, तलाठी लक्ष्मणराव देशमुख, रवी अंभोरे, बालाजी वसमतकर, भास्कर शेळके, उज्ज्वला वानखेडे, प्रेरणा राऊत, सोनाली काकडे, सुजाता गंगातिरे, दीक्षा नरवाडे, अंकुश पन्नासे, गोविंद पांचाळ, ओम भांडवले यांनी परिश्रम घेतले.

# रस्ता सुरक्षा सरप्राईज गिफ्ट्सचे जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या हस्ते वितरण




**नांदेड (प्रतिनिधी)–** रस्ता सुरक्षा सरप्राईज गिफ्ट्सचे जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांच्या हस्ते नुकतेच वितरण करण्यात आले.

वाहतूक पोलीस, परिवहन विभाग आणि 'सेफर इंडियन रोड्स' यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते कार्यक्रमाचा शुभारंभ महात्मा ज्योतिबा फुले पुतळा परिसर आयटीआय चौक येथे करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत कंकरेज, वाहतूक पोलीस इन्स्पेक्टर भागवत नागरगोजे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी हेल्मेट आणि सीट बेल्ट घालून वाहतुकीचे नियम व कायदे पाळणाऱ्या नागरिकांना रस्ते सुरक्षा सरप्राईज भेटवस्तू आणि रस्ते चिन्हांचा तक्ता देऊन सन्मानित केले. नागरिकांशी बोलताना त्यांनी रस्ते चिन्हांच्या तक्त्याचे प्रकाशन केले.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, रस्ते सुरक्षा ही एक सामायिक जबाबदारी आहे आणि प्रत्येक रस्ता वापरकर्त्याने वाहतुकीचे नियम व चिन्हांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. तसेच त्यांनी इतर रस्ता वापरकर्त्यांचा आदर करण्याचे आवाहन केले.

ते म्हणाले की, मोटार आणि मानवी लोकसंख्येच्या वाढीमुळे धोकादायक रस्ता वापरकर्त्यांवर नियंत्रण ठेवणे कठीण झाले आहे आणि जीवघेणे रस्ते अपघात थांबवण्यासाठी प्रत्येक रस्ता वापरकर्त्याने आदराने रस्ते सुरक्षेचे पालन केले पाहिजे.

कार्यक्रमात पोलीस वाहतूक नांदेडचे संतोष तिडके, श्रीमती शिवकांथा जयलवाल, घनशाम ओझा, परीक्षित ओझा, महेश तिवारी, भास्कर थेटे, सोनू उपाध्याय, तरुण तिवारी, विवेक तिवारी, वरुण तिवारी, श्रीमती ओझा, श्रीमती ओझा, श्रीमती स्वाती उपाध्याय, श्रीमती अनमोल पंडित, कु. नेतल तिवारी, कु. सृष्टी उपाध्याय, बेबी प्रमुघडा सहभागी झाले होते.

# सब्बनवार माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा ९६ टक्के निकाल

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** येथील कै. गंगाबाई पोतण्णा सब्बनवार माध्यमिक विद्यालयाच्या देदीप्यमान यशाची परंपरा याही वर्षी कायम राखत ९५.६५% इतका निकाल नोंदविला आहे.

यंदा एकूण ४६ विद्यार्थिनी परीक्षेत बसल्या होत्या. त्यापैकी ४४ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून, दहा विद्यार्थिनी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्या, तर १५ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.

शाळेतून सर्वप्रथम येण्याचा मान कु. मोकळे आरती बालकिशन हिने ९१.२० % घेऊन पटकाविला आहे. कु. खांडरे शिवगंगा राजू ही ८७. ४० % गुण घेऊन शाळेतून सर्वद्वितीय आली. कु. सूर्यवंशी श्रावणी अर्जुन ही ८६.८०% घेऊन तृतीय आली.

विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कु. घंटेवाड वैष्णवी इरवंत ८६.६०%, कु. जल्दावार पूजा संजय ८६.२०%, कु. स्वामी राही सिद्धेश्वर ८२.४०%, कु. सूत्रावे अंजली साईनाथ ७८.८०%, कु. कोलंबरे संध्या प्रकाश ७८.२०%, कु. हिवराळे अपर्णा मारुतीराव ७५.२०%, कु. मदीकुंटावार वैष्णवी ७५ % यांचा समावेश आहे.

संस्थेचे अध्यक्ष श्रीमती कुसुमताई गंगाधरराव सब्बनवार, संस्थेचे सचिव डॉ. प्रशांत गंगाधरराव सब्बनवार तसेच माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कल्याण गायकवाड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक नागनाथ चेटलुरे व संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाचे सर्व कर्मचारीवृंद यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत परभणी रेल्वे स्थानकावर चोरीचे प्रयत्न उधळून लावण्यात आरपीएफला यश

**नांदेड (प्रतिनिधी)** –रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि संरक्षणासाठी सुरू असलेल्या ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत रेल्वे सुरक्षा बल, नांदेड विभाग सतत दक्षता आणि प्रतिबंधात्मक कारवाई करीत आहे. रेल्वेच्या मालमत्तेची चोरी करणाऱ्या दोघांना ताब्यात घेऊन लोहमार्ग पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.



बुधवार, दि. ६ मे रोजी क्राईम इंटेलिजन्स ब्रँच, नांदेड यांच्या पथकाने परभणी रेल्वे स्थानकावर दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये प्रवाशांना लक्ष्य करणाऱ्या दोन संशयित चोरट्यांना ताब्यात घेण्यात यश मिळविले.

पहिल्या घटनेत सकाळी सुमारे ९:३० वाजता अमोल वावळे, पोलीस उपनिरीक्षक नांदेड हे गाडी क्रमांक १७२५३ गंटूर–छत्रपती संभाजीनगर एक्सप्रेसच्या थांब्यादरम्यान परभणी रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक २ जवळ प्रवाशांच्या सामान चोरी करणाऱ्या संशयितांवर नजर ठेवून होते. यावेळी पादचारी पुलाजवळ प्रवाशांचे सामान चोरण्याचा प्रयत्न करत असताना परभणी जिल्ह्यातील पूर्णा येथील दीपक नामक संशयितास ताब्यात घेण्यात आले.

तसेच त्याच दिवशी सुमारे ११:३० वाजता अमोल वावळे, पोलीस उपनिरीक्षक नांदेड यांनी गाडी क्रमांक १७६१८ हजूर साहिब नांदेड–छत्रपती संभाजीनगर तपोवन एक्सप्रेसच्या थांब्यादरम्यान प्लॅटफॉर्म क्रमांक ३ जवळ देखरेख करत असताना आणखी एका संशयितास ताब्यात घेतले. जालना जिल्ह्यातील परतूर येथील महादेव नामक आरोपी पादचारी पुलाजवळ प्रवाशांचे सामान चोरी करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आढळून आले.

दोन्ही आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी लोहमार्ग पोलीस परभणी यांच्या ताब्यात देण्यात आले. GRP/परभणी यांनी अनुक्रमे नांदेड लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९५/२०२६ व ९६/२०२६ महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ११० व ११७ अंतर्गत नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

रेल्वे स्थानके आणि गाड्यांमध्ये प्रवाशांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी सतत देखरेख, गुप्त माहिती संकलन आणि सक्रिय मोहिमांद्वारे आरपीएफ नांदेड विभाग कटिबद्ध असल्याचे रेल्वे प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले.

# दहावी परीक्षेत शिवाजी विद्यालयाचा नवीन नांदेड भागात सर्वोत्तम निकाल

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी संचलित शिवाजी माध्यमिक विद्यालय सिडको नांदेड येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२६ मधील परीक्षेत उत्तीर्ण होण्याची आणि नवीन नांदेड भागातून सर्वोच्च निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेचा एकत्रित निकाल ९४.८९ % असा लागला आहे.

शिवाजी विद्यालयाने परीक्षेच्या निकालात यंदाही आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. शाळेतील एकूण २७४ विद्यार्थी प्रविष्ट होते. त्यातील २६० विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. शाळेतील तब्बल ८५ विद्यार्थी विशेष प्राविण्यात, ७४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ७९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

शाळेतून प्रथम येण्याचा मान शिवांगी अशोक मळगे हिने मिळवला असून तिला ९८.६०% गुण मिळाले आहेत. तर समर्थ गजानन शिंदे ९८% गुण मिळवून सर्वद्वितीय आला आहे आणि कु. सायली संतोष दासरवार व वैभवी ओमप्रकाश सूत्रावे या विद्यार्थिनींनी ९७.८०% मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

या गुणवत्तापूर्ण यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव, प्राचार्य रवी शिवाजीराव जाधव, समन्वयक साहेबराव देवरे, पर्यवेक्षक विकास पाटील, मुख्य लिपीक वसंत वाघमारे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थी आणि पालकांचे अभिनंदन केले.

# बुद्ध आणि बुद्धांचे विचार हेच मानवांच्या हयातीतील अंतिम सत्य -प्रा. डॉ. जाधव

## 'पौर्णिमेच्या प्रकाशात बुद्धाचे जीवन' पुस्तकाचे थाटात प्रकाशन



**धर्माबाद (प्रतिनिधी)–** बुद्ध आणि बुद्धांचे विचार हेच मानवांच्या हयातीतील अंतिम सत्य आहे. बुद्धांच्या जीवनातील प्रत्येक परमोच्च घटना ह्या पौर्णिमेच्या दिवशी घडलेल्या आहेत. टी. जी. तुरे यांनी साकार केलेले पौर्णिमेच्या प्रकाशात बुद्धाचे जीवन हे पुस्तक अतिशय वाचनीय आहे, अशी प्रतिक्रिया भोकरचे बिंदू महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. जे. टी. जाधव यांनी दिली. धर्माबाद येथे आयोजित बुद्धाचे जीवन या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हुतात्मा पानसरे मेमोरियल ट्रस्टचे सचिव ॲड. विश्वनाथ पाटील बन्नाळीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून व समीक्षणात्मक व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. जे. टी. जाधव, उपप्राचार्य डॉ. पी. जे. थोटे, कुंडलवाडी येथील मिलिंद महाविद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक पी. आय. गायकवाड, संचालक विजय वीर, भारतीय बौद्ध महासभेचे माजी तालुकाध्यक्ष सदानंद देवके, पत्रकार संजय कदम, प्रा. डॉ. सुनीलचंद्र सोनकांबळे यांच्यासह साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# कै. कोंडाबाई व्यवहारे मा. व उच्च मा. विद्यालयाच्या निकालाची परंपरा कायम

**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव तालुक्यातील चिंचगव्हाण येथील कै. कोंडाबाई व्यवहारे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या निकालाची परंपरा यंदाही कायम राहिली आहे.

कै. कोंडाबाई व्यवहारे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता १२ वीचा निकाल ९३.१८ % लागला आहे. यामध्ये वाणिज्य शाखा १०० %, विज्ञान शाखा ९१.६६ % तर कला शाखा ८९.४७ % एवढा लागला आहे.

विद्यालयातील लिपीक राठोड यांचा मुलगा आयुष बाळू राठोड याने ७७.६७ % घेऊन मनाठा केंद्रातून तसेच विद्यालयातून प्रथम क्रमांक मिळवला आहे. या विद्यार्थ्याने ग्रामीण भागातून विज्ञान शाखा सर्वोच्च ठिकाणी नेली आहे. त्यामुळे मनाठा केंद्रामध्ये व आजूबाजूच्या परिसरामध्ये या विद्यार्थ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. तसेच वाणिज्य शाखेतून कुमारी शुभांगी शिवाजी बेळगर ही ७७.८३% घेऊन हदगाव तालुक्यातून प्रथम आली आहे. कोणत्याही प्रकारची खाजगी शिकवणी नसतानासुद्धा या विद्यार्थिनीने स्वतःच्या कर्तृत्वावर आपले यश संपादन केले आहे. त्यामुळे या मुलीची चर्चा हदगाव तालुक्यात तसेच ग्रामीण भागामध्ये होत आहे.

# माळाकोळी सर्कलसह लोहा तालुक्यात तीव्र पाणीटंचाई; तत्काळ उपाययोजना करा, अन्यथा काँग्रेस आंदोलन करणार

**लोहा (प्रतिनिधी)** –माळाकोळी सर्कलसह लोहा तालुक्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, यावर प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करुन पाणी पुरवठा सुरळीत करावा अन्यथा काँग्रेस पक्षाच्या वतीने घंटानाद आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे काँग्रेसने दिला आहे.



तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या ५ वर्षांपासून चालू असलेल्या जलजीवन योजनेमधून अद्यापपर्यंत अनेक गावांतील नळाला पाणी आले नाही. त्यामुळे माळाकोळी सर्कल व लोहा तालुक्यातील गावातील सर्वसामान्य जनतेला भेडसावणाऱ्या पाण्याचा प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. तसेच माळाकोळी सर्कलसह लोहा तालुक्यातील अनेक गावांत वाडी-तांड्यांवर पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करून द्यावी, तसेच आवश्यक त्या ठिकाणी त्वरित टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली. पाण्याच्या अभावामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. तसेच यावेळी बोलताना भीमाशंकर कापसे यांनी प्रशासनावर टीका करीत जोपर्यंत पाण्याचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहील, असेही या निवेदनात म्हटले आहे.

यावेळी काँग्रेस पक्षाचे बाबासाहेब बाबर, काशीराम जामकर, भारत मस्के, राजरत्न गायकवाड, रमेश ठाकूर, राम पाटील कापसे, दीपक रायफळे, प्रसाद भैया पोले, विजय केंद्रे, प्रमोद नागरगोजे, रितेश एडके आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# एमजीएममध्ये एम.लिब.च्या विद्यार्थ्यांना उत्साहात निरोप



**नांदेड (प्रतिनिधी)–** एमजीएम ग्रंथालय आणि माहितीशास्त्र महाविद्यालयात एम. लिब. २०२५-२६ च्या विद्यार्थ्यांच्या लघु शोधनिबंधाच्या मौखिक परीक्षा विद्यापीठ वेळापत्रकानुसार महाविद्यालयात नुकत्याच पार पडल्या.

त्यानंतर या सर्व विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी संत संभाजी शिंदे ग्रंथालयशास्त्र महाविद्यालय परभणीचे प्राचार्य प्रोफेसर वसंतराव गुट्टे उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयातर्फे पाहुण्यांचा ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. गोविंद हंबर्डे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यार्थ्यांसह महाविद्यालयाचे प्रा. केदार रोकडे, प्रा. त्र्यंबक देशमुख, प्रा. आकाश तेलंग आणि गौरव देशमुख यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# ग्रामीण भागासाठी आपले सरकार सेवा केंद्र प्राथमिक निवड

**नांदेड (प्रतिलिणी)–** जिल्हा सेतू समिती नांदेडमार्फत जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी आपले सरकार सेवा केंद्र ग्रामपंचायतनिहाय प्राथमिक निवड/ मुलाखत, निरंक शुध्दिपत्रक यादी, सोमवार ११ मे २०२६ रोजी https://nanded.gov.in/ https://setusamitinanded.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे.

तसेच मुलाखतीस पात्र ठरलेल्या अर्जदारांची मुलाखत १५ व १६ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे घेण्याचे प्रस्तावित आहे. तालुकानिहाय मुलाखतीचे वेळापत्रक नांदेड जिल्ह्याच्या संकेतस्थळावर सविस्तरपणे प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत कोणत्याही अर्जदारास वैयक्तिकरित्या स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही. तसेच कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. त्यामुळे सर्व अर्जदारांनी https://nanded.gov.in/ हे संकेतस्थळ नियमितपणे पहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव सेतू समिती नांदेड यांनी केले आहे.

# लोहा येथील बुलढाणा अर्बन बँकेने मयत कर्जदारांच्या वारसांना केले विमा धनादेश वाटप



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा येथील बुलडाणा अर्बन सहकारी बॅंकेने सामाजिक बांधीलकी व ग्राहकांचे हित जोपासत मयत कर्जदारांच्या वारसास विमा धनादेश वाटप करुन आर्थिक मदत केली आहे.

लोहा येथील बुलडाणा अर्बन बॅंकेच्या वतीने मयत कर्जदार केशव पुंडलिक मोरे या सभासदाच्या वारसदार श्रीमती संगीता केशव मोरे व लक्ष्मण इरबाजी आलट, श्रीमती द्रौपदी लक्ष्मण आलट यांना अपघाती विमा धनादेशाचे विभागीय व्यवस्थापक प्रफुल्ल संचेती यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

लोहा तालुक्यातील कारेगाव येथील संस्थेचे सभासद व सोनेतारण कर्जदार १ केशव पुंडलिक मोरे यांनी दिनांक २० ऑक्टोबर २०२५ रोजी सोन्याची अंगठी ठेवून ५० हजार रुपये कर्ज घेतले होते. दि. ७ जानेवारी २०२६ रोजी नांदेड-लातूर महामार्गावरील लोहा वळण रस्त्यानजीक ट्रक व दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

सोनेतारण कर्जदार लक्ष्मण इरबाजी आलट हे रा. हर्षद पो. कारेगाव, ता. लोहा येथील रहिवासी असून, त्यांना दिनांक ०७ मे २०२५ रोजी विजेच्या तारेचा शॉक लागला. या घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला. दि. २८ एप्रिल २०२५ रोजी त्यांनी सोनेतारण कर्ज ४० हजार रुपये घेतले होते. दोन्ही घटनेची माहिती मिळताच विभागीय व्यवस्थापक प्रफुल्ल संचेती यांच्या मार्गदर्शनानुसार शाखा व्यवस्थापक केशव शेट्टी यांनी मोरे परिवाराचे व अलट परिवाराचे सांत्वन करून संस्थेच्या अपघात विमा बाबत माहिती दिली.

# स्वारातीम विद्यापीठाचे प्रथम परीक्षा नियंत्रक जयंत येवतीकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रथम परीक्षा नियंत्रक तथा प्राचार्य जयंत येवतीकर यांचे दि. ६ मे, २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे विद्यापीठ परिवारावर शोककळा पसरली असून, शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात शुक्रवार, दि. ८ मे २०२६ रोजी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, विधी अधिकारी विनायक भोसले, डॉ. लक्ष्मीकांत आगलावे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सभेस विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून दिवंगत जयंत येवतीकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## चार्जिंग केबल तुटते वारंवार?

**स्मार्टफोनची गुणवत्ता बदलत्या काळात लक्षणीयरीत्या सुधारली. मात्र चार्जिंग केबल्सच्या गुणवत्तेत फारसा बदल झालेला नाही. अनेकदा असे दिसून येते, की सततच्या वापरानंतर, चार्जिंग केबल्स कनेक्टर असलेल्या ठिकाणी तुटतात. बरेच लोक त्यांच्या चार्जिंग केबल्सची खूप काळजी घेतात, तरीही त्या तुटतच राहतात. त्यामुळे, केबल्स वारंवार का तुटतात आणि त्यांचे संरक्षण करण्याचे काही मार्ग आहेत का, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.**

### केबलची रचना समजून घ्या...

केबलमध्ये इन्सुलेशनने झाकलेल्या अत्यंत पातळ धातूच्या तारा असतात. केबलचा जो भाग प्लग जोडलेला असतो तो सर्वात संवेदनशील असतो. जेव्हा आपण केबल जास्त वाकवतो, तेव्हा प्लगवर ताण येतो. तज्ज्ञांच्या मते, सूक्ष्म पातळीवर जेव्हा आपण केबलला तिच्या क्षमतेपेक्षा जास्त वाकवतो तेव्हा धातू आणि बाह्य थर तुटू लागतात. केबलच्या वारंवार वाकण्यामुळे धातू कठीण आणि कमकुवत होतो. ज्यामुळे अखेरीस ती तुटते. म्हणूनच, केबल्स वापरताना कनेक्टरजवळ त्या सरळ राहतील याची खात्री करा.

### केबल्स वारंवार का तुटतात?

केबल तुटण्याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे अयोग्य वापर. केबलला मधून पकडून फोन किंवा चार्जरमधून बाहेर ओढणे किंवा केबल जास्त ताणणे यांचा समावेश होतो. या वारंवार होणाऱ्या प्रकारामुळे केबल कनेक्टरमधील अंतर्गत सोल्डरचे जोड सैल होऊ शकतात किंवा तुटू शकतात. उष्णता हा देखील एक मोठा धोका आहे. केबल गरम गाडीत ठेवल्याने किंवा निकृष्ट दर्जाचे अडॅप्टर वापरल्याने व्होल्टेजच्या दाबामुळे केबलमधील चिपला नुकसान पोहोचू शकते.

### चार्जिंग केबल्स सुरक्षित कशा ठेवाव्यात?

चार्जिंग केबलचे आयुष्य वाढवण्याचे अनेक मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे, केबलला जबरदस्तीने वाकवणे टाळणे, विशेषतः कनेक्टरच्या ठिकाणी. तुमचा फोन चार्जिंगला लावताना फोन आणि चार्जरमधील कनेक्टरची तार सरळ आहे, कोनात वाकलेली नाही याची खात्री करा. चार्जर किंवा फोनमधून केबल काढताना, ती मधून ओढण्याऐवजी कनेक्टरला धरून काढा. ब्रेडेड केबल्स निवडा. त्यांचे सिलिकॉन प्लास्टिक केबल्सपेक्षा आयुष्यमान जास्त असते. वापरात नसताना केबल्स अशा ठिकाणी ठेवा जिथे त्या अनावश्यकपणे गरम होणार नाहीत. वापरात नसताना त्या नक्की अनप्लग करा. केबल्स प्लगमध्ये लावलेल्या असतानाही खूप गरम होऊ शकतात, ज्यामुळे त्यांच्या बाह्य पृष्ठभागाची अकाली झीज होऊ शकते. केबलच्या कनेक्टर पॉइंट्सवर प्लास्टिकचे सपोर्ट प्लग लावा. यामुळे केबल्स मजबूत होण्यास मदत होते आणि वारंवार वाकल्यामुळे तुटणार नाहीत.

## विमानात पॉवर बँक घेऊन जाताहेत?

महत्त्वाच्या सात गोष्टींकडे नका करू दुर्लक्ष, योग्य पद्धत समजून घ्या...



**हैदराबादहून आलेल्या इंडिगो विमानातील एका प्रवाशाच्या पॉवर बँकेला चंदीगड विमानतळावर आग लागली. यामुळे प्रवाशांना तातडीने बाहेर काढावे लागले. या घटनेत काही प्रवासी जखमी झाल्याचेही वृत्त आहे. यामुळे हा प्रश्न निर्माण होतो: विमानाने प्रवास करत असल्यास पॉवर बँकच्या बाबतीत कोणती खबरदारी घ्यावी? विमानात पॉवर बँक वापरण्यास आधीच मनाई असली तरी, ती न वापरलेली असतानाही स्फोट होण्याचा धोका असतो. विमानामधील उच्च दाबामुळे याची शक्यता आणखी वाढते. याच कारणामुळे विमानात पॉवर बँक घेऊन जाताना तुम्ही काही महत्त्वाची खबरदारी घेतली पाहिजे. यामध्ये पॉवर बँक योग्य ठिकाणी ठेवणे आणि चार्जिंगची योग्य पातळी राखणे यांचा समावेश आहे. यामुळे तुमची आणि इतर सर्वांची सुरक्षितता सुनिश्चित होऊ शकते.**

» पॉवर बँक योग्य ठिकाणी ठेवा : विमानात चेक-इन केलेल्या सामानात पॉवर बँक नेण्याची परवानगी नाही. अशा परिस्थितीत लोक अनेकदा पॉवर बँक हातातील सामानात, जसे की बॅग किंवा मिनी ट्रॉलीमध्ये, ओव्हरहेड कंपार्टमेंटमध्ये ठेवतात. तथापि, तुम्ही तुमची पॉवर बँक अशा ठिकाणी ठेवली पाहिजे जी आपत्कालीन परिस्थितीत सहज उपलब्ध होईल. अशा परिस्थितीत तुमचा पॉवर बँक ओव्हरहेड केबिनमध्ये ठेवण्याऐवजी, ती समोरच्या सीटखालील बॅगेत ठेवावा.

» कमी पातळीवर चार्ज करून ठेवा : विमान प्रवासादरम्यान पॉवर बँक २५% पेक्षा कमी चार्ज करून ठेवा. एवढ्या पॉवरमुळे, तुम्ही विमानातून उतरल्यावरही तुमचा फोन व्यवस्थित चार्ज करू शकता आणि चार्जिंगची ही पातळी विमान प्रवासादरम्यान पॉवर बँक अधिक सुरक्षित ठेवते.

» कमी क्षमतेचा पॉवर बँक सोबत ठेवा : २०,००० ते २५,००० mAh क्षमतेच्या पॉवर बँकांना विमानात नेण्याची परवानगी आहे. तथापि, सुरक्षिततेच्या कारणास्तव, क्षमता जितकी कमी असेल तितके चांगले. ५००० ते १०००० mAh क्षमतेच्या पॉवर बँका विमान प्रवासादरम्यान अधिक सुरक्षित असू शकतात.

» विमानतळावर किंवा विमानात चार्जिंग करणे : विमानात पॉवर बँक सोबत घेऊन प्रवास करण्याचा एक स्मार्ट मार्ग म्हणजे विमानतळावर तुमचा फोन किंवा इतर डिव्हाइस पूर्णपणे चार्ज करणे. जर विमानप्रवास लांबचा असेल, तर चार्जिंग केबल सोबत ठेवा आणि विमानात उपलब्ध असलेल्या चार्जिंग पर्यायांचा वापर करा. यामुळे पॉवर बँकची चार्ज पातळी कमी झाल्यास कोणतीही अडचण येणार नाही.

» फुगलेली पॉवर बँक सोबत बाळगू नका : अनेकदा असे दिसून येते की, पॉवर बँक फुगलेली असली तरीही लोक तिचा वापर करत राहतात. अशा पॉवर बँक्स सामान्यपणे वापरल्या तरी धोकादायक ठरू शकतात, म्हणून त्या विमानप्रवासात कधीही सोबत नेऊ नका. फुगलेल्या बॅटरी असलेल्या पॉवर बँक्समुळे स्फोट होण्याचा धोका असतो.

» पॉवर बँकमध्ये केबल्स लावलेल्या सोडू नका : जर तुम्ही विमानप्रवासात पॉवर बँक सोबत नेत असाल, तर त्यात कोणतीही केबल लावलेली सोडू नका. जेव्हा पॉवर बँकमध्ये केबल लावलेली असते, तेव्हा तिचे सर्किट चालू राहते. अशा प्रकारे, तुमची पॉवर बँक कार्यरत राहते. विमानप्रवासादरम्यान तुमच्या पॉवर बँकमध्ये कोणतीही केबल लावलेली सोडू नका.

» सुरक्षा वैशिष्ट्यांसह ब्रँडेड पॉवर बँक वापरा : नेहमी नामांकित पॉवर बँक वापरा. त्यात ओव्हरचार्जिंग प्रोटेक्शन किंवा ओव्हरहीटिंग प्रोटेक्शन यांसारखी सर्व आवश्यक सुरक्षा वैशिष्ट्ये असल्याची खात्री करा.

## राउटरवर नाणे ठेवल्याने इंटरनेटचा वेग वाढतो का?

वाय-फाय राउटरवर नाणे ठेवल्याने इंटरनेटचा वेग वाढतो का? खरे तर, वाय-फाय राउटरमध्ये फेरफार करून इंटरनेटचा वेग किंवा सिग्नलची ताकद वाढवण्याचे दावे केले गेले आहेत. यापैकी काही गोष्टी खरोखरच काम करतात, तर काही केवळ गैरसमज आहेत. यामुळे हा प्रश्न निर्माण होतो : राउटरवर नाणे ठेवण्याची युक्ती खरोखरच काम करते का? अहवालानुसार, तज्ज्ञांना ही युक्ती अजिबात प्रभावी वाटत नाही. त्यांच्या मते, राउटरवर नाणे ठेवून वेग वाढवण्याचा दावा हा निव्वळ एक भ्रम आहे. या युक्तीमध्ये राउटरच्या प्लास्टिक बॉडीवर नाणे ठेवले जाते. यामुळे ही युक्ती काम करणे जवळजवळ अशक्य होते, कारण ते राउटरच्या वेग किंवा सिग्नल वाढवणाऱ्या कोणत्याही घटकांच्या थेट संपर्कात येत नाही.

» राउटरवर नाणे ठेवण्याची युक्ती किती प्रभावी आहे? : वाय-फाय राउटर रेडिओ फ्रिक्वेन्सी वापरून चालतात. त्यांचे अँटेना विद्युत सिग्नलचे विद्युत चुंबकीय लहरींमध्ये रूपांतर करण्यासाठी अचूकपणे तयार केलेले असतात. नाणे म्हणजे फक्त धातूचा एक तुकडा आहे, जो या युक्तीनुसार राउटरच्या बॉडीवर ठेवला जातो. परिणामी, नाण्याचा राउटरच्या अंतर्गत सर्किटरीशी कोणताही संबंध नसतो. ते अँटेनावर परिणाम करू शकत नाही किंवा सिग्नल वाढवू किंवा कमी करू शकत नाही. दुसऱ्या शब्दांत, नाणे इतके लहान आहे की ते वाय-फाय लहरींवर परिणाम करू शकत नाही.

» उलट राउटरला नुकसान पोहोचू शकते... : अहवालानुसार, या युक्तीमुळे इंटरनेटचा वेग वाढत नाही किंवा राउटरला नुकसानही पोहोचत नाही. खरे तर, राउटरवर नाणे ठेवल्याने राउटरचे व्हेंट्स (हवा बाहेर काढण्याची जागा) बंद होण्याचा धोका असतो, ज्यामुळे उष्णता बाहेर पडण्यास अडथळा येतो. यामुळे राउटरची कार्यक्षमता कमी होऊ शकते, इंटरनेटचा वेग मंदावू शकतो आणि वारंवार कनेक्शन तुटू शकते. दीर्घकाळात यामुळे तुमचा राउटर पूर्णपणे खराबही होऊ शकतो. अशा परिस्थितीत, राउटरवर नाणे ठेवण्याच्या युक्तीमुळे चांगल्या वेगापेक्षा जास्त नुकसान होऊ शकते.

» इंटरनेटचा वेग कसा वाढवावा : जर तुम्हाला तुमच्या इंटरनेटचा वेग वाढवायचा असेल, तर राउटरसाठी योग्य जागा निवडणे महत्त्वाचे आहे. राउटर घराच्या मध्यभागी ठेवा. राउटर जमिनीजवळ न ठेवता छताजवळ ठेवा, जेणेकरून वायफाय सिग्नल संपूर्ण घरात चांगल्या प्रकारे पसरेल. तो टीव्ही, मायक्रोवेव्ह किंवा मोठ्या धातूच्या कॅबिनेटच्या मागे लपवू नका. कारण धातू आणि इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू वायफाय सिग्नलला अडवतात. आपला राउटर स्वच्छ ठेवा.

# अजब-गजब

## चॅम्पियन डॉग..!

### स्कूटर रायडिंगमध्ये भल्याभल्यांना टाकतो मागे

जॉर्जिया : स्कूटर रायडिंग आपल्याकडे फारसे कुणी करताना दिसत नाही. पण अनेक हिंदी चित्रपटांत आपण स्कूटर रायडिंग बघितली असेल. विदेशात मात्र स्कूटर रायडिंग लोकांचा आवडता खेळ आहे. या खेळाच्या अनेक स्पर्धाही होतात. पण माणसांच्या या खेळात अचानक एका कुत्र्याला फारच आवड निर्माण झाली आहे. त्यानेही स्कूटर रायडिंग शिकून घेतली आणि आता माणसांनाच मागे टाकू लागला आहे. एक कुत्रा उत्कृष्ठरित्या स्कूटर रायडिंग करत असल्याचे पाहून सर्वांचीच बोटे तोंडात जातात.

जॉर्जियाच्या कॅनटॉन शहरातील नॉर्मन नावाच्या या २० महिन्यांच्या कुत्र्याने आतापर्यंत अनेक स्कूटर रायडिंग स्पर्धा जिंकल्या असून, त्यामुळे आता त्याला चॅम्पियन डॉग नावाने ओळखले जाऊ लागले आहे. नॉर्मनचे मालक कॅरेन कॉब यांनाही स्कूटर रायडिंगचा शौक आहे. ते स्वतः खेळत असताना आपल्या कुत्र्याला सोबत घ्यायचे. एक दिवस त्यांनी कुत्र्याला स्वतंत्रपणे स्कूटर सोपविली. त्यानंतर त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. कुत्रा चक्क सराईतपणे स्कूटर रायडिंग करत होता. त्या वेळी नॉर्मनचे वय होते अवघे १५ महिने. त्यानंतर कॅरेन यांनी त्याला छोट्या मोठ्या स्पर्धात सहभागी केले. त्यातही नॉर्मननेच बाजी मारली. त्यामुळे नॉर्मन प्रकाशझोतात आला. प्रसारमाध्यमांनीही या अनोख्या कुत्र्याला प्रचंड प्रसिद्धी दिली. इंटरनेटवर नॉर्मनच्या स्कूटर रायडिंगचा नमूना युट्यूबवर उपलब्ध झाला आहे. तो हजारो लोकांनी पाहून आश्चर्य व्यक्त केले आहे.



## म्युझिकल डॉग... कुत्रा चक्क गाणे म्हणतो!



बीजिंग : चीनमध्ये एक कुत्रा सध्या सर्वांच्या आकर्षणाचे केंद्र बनला असून, तो चक्क गाणे म्हणतो. या म्युझिकल कुत्र्याचे नाव प्रिन्स आहे. त्याला बीजिंग येथील पाळीव प्राण्यांच्या एका पाळणाघरात (पेट शॉप) ठेवले आहे. वियर्ड न्यूज आशिया या वृत्तपत्रात प्रिन्सची बातमी आली आहे. बातमीत पेट शॉपचे मालक हो जिन्ह्यू यांनी म्हटले आहे, की एक दिवस रात्री कुणीतरी गाणे म्हणत असल्याने माझी झोपमोड झाली. त्यामुळे वैतागून मी कोण आहे हे बघू लागलो. तर चक्क कुत्रा गाणे म्हणत असल्याचे दिसले. एखादा कुत्रा गाणे म्हणतो, यावर सुरुवातीला माझा विश्वासच बसला नाही. पण तरीही डोळ्यांनी बघत आणि कानांनी ऐकत असल्याने विश्वास ठेवावा लागला. दुसऱ्या दिवशी जिन्ह्यू यांनी आपल्या मित्रांना ही बाब सांगितली तेव्हा त्यांनीही विश्वास ठेवला नव्हता. त्यांनी पाळणाघराकडे येऊन खात्री करून घेतली. कर्णोपकर्णी ही माहिती संपूर्ण बीजिंगमध्ये पसरली. त्यामुळे पत्रकारांनीही जिन्ह्यू यांच्या पाळणाघराकडे धाव घेतली. त्यामुळे कुत्र्याची चर्चा आता केवळ चीनमध्येच नाही तर जगभरात होऊ लागली आहे. प्रिन्स गातो तेव्हा लोक आश्चर्यचकीत होऊन बघत राहतात. अर्थात त्याच्या गाण्यात सूर, ताल, लय यापैकी कोणत्याही गोष्टीचा ताळमेळ नसला तरी कुत्रा गातोय, हेच सर्वांसाठी आश्चर्य आहे. प्रिन्स प्रेमाची गाणी सोडून सर्व गाणी म्हणतो. प्रिन्सच्या अनोख्या पणाबद्दल अनेकांनी त्याला विकत घेण्याची इच्छा व्यक्त केली पण जिन्ह्यू यांनी प्रिन्सला न विकण्याचा निर्णय घेतला आहे. प्रिन्स अचानक गाणे कसे म्हणायला लागला, याचे कोडे मात्र सर्वांनाच आहे. शास्त्रज्ञांनी आता या बदलाचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी ते रोज जिन्ह्यू यांच्या पाळणाघरात हजेरी लावत आहेत.

## युवतीची 'विरू'गिरी...

### प्रियकराला प्रपोज करण्यासाठी कारवर चढली!



बीजिंग : शोले चित्रपटात विरू आपल्या बसंतीला मनवण्यासाठी पाण्याच्या टाकीवर चढला होता. चीनमधील एका युवतीनेही याच पद्धतीने प्रियकराला मागणी घालण्याचा निर्णय घेतला. पण पाण्याच्या टाकीवर चढण्याऐवजी तिने कार निवडली आणि कारवर चढून प्रियकराला लग्नाची गळ घातली. तेव्हा त्यानेही होकार भरला. चीनच्या वुहान विद्यापीठाच्या आवारात हा प्रकार घडला. एक विद्यार्थिनी आपल्या कारने विद्यापीठात आली आणि मित्रांसोबत उभ्या असलेल्या प्रियकराजवळ कार थांबवली. काही कळायच्या आत ती कारवर चढली आणि हातात फुलांचा गुच्छ घेऊन माझ्याशी लग्न करशील का, अशी मागणी प्रियकराला घातली. तिने अशा अनोख्या पद्धतीने घातलेली मागणी ऐकून प्रियकर गोंधळून गेला. विद्यार्थिनीला वाटले की या रोमॅन्टिक पद्धतीने आपला प्रियकर प्रचंड खुश होईल आणि आनंदाने आपल्या प्रेमाचा स्वीकार करेल. पण झाले उलटेच. तिच्या प्रियकराने तिला आधी खाली उतरण्यास सांगितले. ती खाली उतरली तेव्हा त्याने समजावून सांगणे सुरू केले. या क्षणी तुला देण्यासाठी माझ्याकडे काहीही नाही. सध्या तू ज्या ऐशोआरामात राहतेस, ते माझ्याशी लग्न करून तुला मिळणार नाहीत. उप्परही तुला माझ्याशीच लग्न करायचे असेल तर तीन वर्षे वाट बघ. मी तेव्हाच तुझ्याशी लग्न करीन जेव्हा माझ्याकडे गाडी आणि घर असेल... प्रियकराचे हे शब्द ऐकून प्रेयसी इतकी भावनाविवश झाली की तिला रडू कोसळले आणि ती पुन्हा कारवर चढली. अखेर पंधरा मिनिटांनी प्रियकरानेच माघार घेतली आणि तिला होकार दिला. मग ती कारवरून उतरली. या अर्ध्या तासाच्या नाट्याने इतर विद्यार्थ्यांचे मात्र चांगलेच मनोरंजन झाले.

## लालची पत्नी... वैतागला पती... स्वत:ला बनवले कफल्लक!

कॅनबरा : एक व्यक्ती आपल्या लालची पत्नीला इतका वैतागला की त्याने रागाच्या भरात सर्व संपत्ती एका सामाजिक संस्थेला दान केली. घरही विकून टाकले. घराची आलेली रक्कम सुद्धा दान केली. पूर्णपणे कफल्लक झाल्यानंतर त्याला पत्नीने सोडले, तेव्हा कुठे त्याच्या जिवात जीव आला... करोडपती असलेला हा ५८ वर्षीय व्यक्ती पत्नीच्या लालची स्वभावामुळे त्रस्त झाला होता. त्याची पत्नी स्वतःच्या हौशी पुरविण्यासाठी प्रचंड खर्च करायची आणि पतीला मात्र काटकसर शिकवायची. पतीकडून थोडाही पैसा खर्च झाला तरी त्याला धारेवर धरायची. यामुळे हा व्यक्ती चांगलाच वैतागून गेला होता. त्याने घटस्फोट मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज केला होता. पण त्याची पत्नी त्याला घटस्फोट देण्यास तयार नव्हती. अखेर त्याने स्वतः कफल्लक होण्याचा निर्णय घेतला. गरीब झाल्यानंतर तरी पत्नी आपल्याला सोडून देईल, असे त्याला वाटले. सर्व संपत्ती त्याने सामाजिक कार्यासाठी दान केली. बँकेचे स्टेटमेंट्स पाण्यात फेकून दिले. आता त्याच्याकडे एक पैसाही उरला नसल्याचे पाहून पत्नीने त्याला सोडण्याचा निर्णय घेतला आणि तिने त्याच्या घटस्फोट अर्जावर सही केली आहे. आता लवकरच त्याचा घटस्फोट होईल आणि तो स्वतंत्रपणे जीवन जगायला सुरुवात करेल.

## 145 रुपये खर्चून मिळवले 10 कोटी!

लंडन : काही लोकांचे नशिब फार जोरावर असते. त्यापैकीच एक लंडनचा स्टीव्ह विटले. एका कंपनीने आपल्या उत्पादनाच्या प्रचारासाठी अनोखी स्क्रीम सुरू केली होती. त्या स्कीममध्ये स्टीव्हचा नंबर लागला. त्याला बस पासने मोफत प्रवासाची संधी मिळाली. मोफतच तो घोड्यांच्या शर्यतीत पोहचला. त्याने एका घोड्यावर 145 रुपयांचा सट्टा लावला. पहिल्याच वेळी तो जिंकला. मग त्याने पुन्हा एका घोड्यावर पैसे लावले. असे करता करता त्याने सहा वेळेस पैसे लावले आणि सहाही वेळेस जिंकला. आता त्याच्याकडे जमा झाले होते, 10 कोटी रुपये! प्रत्येक वेळी जॅकपॉट जिंकणे साधी गोष्ट नाही. पण स्टीव्हचे नशिबच मोठे. 145 रुपयांचे 10 कोटी तयार केल्यामुळे साहाजिकच तो सर्वांच्या आश्चर्याचे कारण बनवला. स्टीव्ह व्यवसायाने अभियंता आहे. त्याचे वयही साठच्या पुढे गेले आहे. त्यामुळे पैशांचा फायदा त्याच्या मुलांना, नातवांना होणार आहे. पूर्ण ब्रिटनमध्ये अशा प्रकारे दहा कोटी जिंकणारे सातच लोक आहेत. त्यातही लागोपाठ सहा वेळेस जिंकणारे बोटावर मोजण्याइतकेच. स्टीव्ह सध्या जाम खुश आहे. म्हातारपणात का होईना नशिबाने साथ दिली. आता मुलांसाठी बरेच काही कमावून जात असल्याचा आनंद मला राहणार आहे, असे तो म्हणाला.



# एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर पूर्ण करा - मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** – एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण तसेच जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गतची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावीत. तसेच भूजल पातळी कमी झालेल्या ठिकाणी प्राधान्याने कामे करून तेथील भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी मृद व जलसंधारण विभागाचा आढावा घेतला. यावेळी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे जल -विषयक सल्लागार श्रीराम वेदिरे, विशेष कार्य अधिकारी प्रिया खान, मृद व जलसंधारण आयुक्त अंजली रमेश, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय देवराज आदी यावेळी उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एल निनोच्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी जलसंधारण, जलयुक्त शिवारमधील कामांचे प्राधान्य ठरवून ती पूर्ण करण्यात यावीत. तसेच जलयुक्त शिवार २.० अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये दुरुस्तींच्या कामांची निकड पाहून ही कामे आराखड्यात समाविष्ट करून तातडीने पूर्ण करावीत. जलयुक्तमधील राज्यस्तरीय आराखडे १५ मे पूर्वी मंजूर करण्यात यावेत. तसेच जिल्ह्यांना सुधारित आराखडे देऊन कामांना गती द्यावी. जलयुक्त शिवारची कामे हाती घेतलेल्या गावांबाहेरील १० टक्के कामेही प्राधान्यक्रम ठरवून हाती घेण्यात यावीत.

केंद्र शासनाच्या 'विकसित भारत जी राम जी' योजनेमध्ये जलसंधारणाच्या कामांवर भर देण्यात आला आहे. त्याचा लाभ घेऊन राज्यातील जलसंधारणाची कामे पूर्ण करून घ्यावीत. जलसंधारण कामाअंतर्गत नालाखोलीकरणची कामे करताना त्याठिकाणी पुन्हा गाळ होऊ नये, यासाठी नाल्याच्या ठिकाणी बांबू लागवड करण्याचा विचार करावा. विदर्भातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे जून महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन करावे. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत वाढीव निधी मिळण्यासाठी केंद्रीय मंत्री यांना स्वतः भेटणार असल्याचेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले की, मृद व जलसंधारण विभागाच्या आकृतीबंधाला मंजुरी मिळाल्याने आता कामास गती येईल. आतापर्यंत मंजुरी दिलेली कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच मूळ आराखड्यानुसारच कामे पूर्ण व्हावीत यासाठी मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. मालगुजारी तलावांच्या ठिकाणी असलेली अतिक्रमणे काढण्याची परवानगी मिळावी. सचिव पापळकर यांनी सांगितले की, जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत विशेष निधी व अभिसरणअंतर्गत आतापर्यंत गाव आराखड्याप्रमाणे १ लाख ४४ हजार ६९७ कामे मंजूर झाली आहेत. त्यापैकी १ लाख १० हजार १२० कामे पूर्ण झाली आहेत. ऊर्वरित कामे प्रगतीपथावर असून लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

एल निनोच्या पार्श्वभूमीवर टँकरग्रस्त आणि भूजल पातळी खालावलेल्या गावांमध्ये प्राधान्याने कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच विविध योजनाअंतर्गत पाणलोट क्षेत्रात झालेल्या मृद व जलसंधारण कामांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी करण्याचे काम सुरू असून आतापर्यंत १५ लाख १५ हजार कामांपैकी १२ लाख २७ हजार संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी झाली आहे.गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अंतर्गत यावर्षी १४३५ जलसाठ्यातून ४७७.७३ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे ३०८३५ सघमी पाणीसाठा पुनर्स्थापित झाला असून ७३ हजार ४१७ एकर क्षेत्र सुपिक झाले आहे. या वर्षी १५ जून पर्यंत जिल्हानिहाय गाळ काढण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

# 'ऑपरेशन सिंदूर'च्या वर्धापनदिनी पाकमध्ये 'लष्कर'चा टॉप कमांडर इस्माईल अहमदचा संशयास्पद मृत्यू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – पाकिस्तानव्याप्त काश्मीर आणि खैबर पख्तुनख्वाच्या सीमेवर शुक्रवारी एक अत्यंत गूढ आणि खळबळजनक घटना घडली. 'मातृभूमी' या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाचा एक अतिशय वरिष्ठ कमांडर इस्माईल अहमद हा अत्यंत संशयास्पद परिस्थितीत मृतावस्थेत आढळून आला आहे. विशेष म्हणजे, ज्या दिवशी 'ऑपरेशन सिंदूर'चा वर्धापन दिन होता, त्याच दिवशी हाफिज सईद या कुख्यात दहशतवाद्याच्या अत्यंत जवळच्या साथीदाराचा असा गूढ मृत्यू झाल्याने अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत.

इस्माईल अहमद हा केवळ एक सामान्य दहशतवादी नव्हता, तर तो 'लष्कर-ए-तैयबा'च्या मुख्य कोअर कमिटीचा (सुकाणू समिती) एक अत्यंत महत्त्वाचा सदस्य होता. भारताला, आणि विशेषतः जम्मू-काश्मीरला टार्गेट करण्यासाठी आखण्यात आलेल्या अनेक भयंकर दहशतवादी कटांमध्ये तो थेट सामील होता. गेल्या काही काळापासून भारताने जागतिक स्तरावर हाफिज सईद आणि त्याच्याशी संबंधित दहशतवादी जाळ्यांवर कारवाई करण्यासाठी प्रचंड दबाव आणला आहे. अशा कडक पाळतीखाली आणि तणावपूर्ण वातावरणात इस्माईलचा हा मृत्यू दहशतवादी गोटातील मोठी पडझड मानली जात आहे. इस्माईल अहमदचा मृत्यू ही काही पहिली घटना नाही. गेल्याच महिन्यात पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतात 'लष्कर'चा आणखी एक वरिष्ठ कमांडर शेख युसूफ आफ्रिदी याची अज्ञात बंदूकधाऱ्यांनी भरदिवसा हत्या केली होती. ही पूर्वनियोजित 'टार्गेट किलिंग' असल्याचा संशय स्थानिक प्रशासनाला आहे.

या हत्येचा थरार एखाद्या चित्रपटासारखा होता. पूर्ण तयारीनिशी आलेल्या सशस्त्र मारेकऱ्यांनी आफ्रिदीवर अचानक हल्ला चढवला. त्यांनी अत्यंत जवळून आणि बेछूट गोळीबार केल्यामुळे आफ्रिदीला तिथून पळ काढण्याची कसलीच संधी मिळाली नाही. शरीरात अनेक गोळ्या घुसल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात तिथेच कोसळला आणि जागीच ठार झाला. ही कारवाई फत्ते केल्यानंतर सर्व मारेकरी डोळ्यांदेखत तिथल्याच जवळच्या डोंगराळ आणि दुर्गम भागात पसार झाले.

या हत्यासत्राची सुरुवात याच वर्षी मार्च महिन्यात झाली होती. त्यावेळी पाकिस्तानच्या मुरीदके येथील 'मरकज तैयबा' या दहशतवाद्यांच्या सर्वात सुरक्षित मानल्या जाणाऱ्या मुख्यालयात घुसून लष्कर-ए-तैयबाचा आणखी एक मोठा कमांडर बिलाल आरिफ सलाफी याचा खात्मा करण्यात आला होता. विशेष म्हणजे, ईदची नमाज अदा करून तो बाहेर पडताच काही क्षणांतच अज्ञात मारेकऱ्यांनी त्याच्यावर गोळीबार केला आणि नंतर चाकूने भोसकून त्याची निर्घृण हत्या केली होती.

# करार करा, अन्यथा भयंकर परिणाम भोगावे लागतील; ट्रम्प यांचा इराणला थेट इशारा!

**वॉशिंटन (वृत्तसंस्था)** – अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी एका घटनेचा खळबळजनक खुलासा केला. त्यांच्या दाव्यानुसार, मध्यपूर्वेतील अत्यंत संवेदनशील मानल्या जाणाऱ्या 'होर्मुझच्या सामुद्रधुनीतून' प्रवास करत असताना अमेरिकेच्या तीन विनाशक युद्धनौकांवर अचानक गोळीबार आणि हल्ला करण्यात आला. सुदैवाने, या भ्याड हल्ल्यात अमेरिकेच्या जहाजांचे कोणतेही नुकसान झाले नाही. मात्र, या घटनेनंतर ट्रम्प यांनी इराणला अत्यंत कडक शब्दांत ताकीद दिली आहे. जर इराणने प्रस्तावित करारावर वेळेत स्वाक्षरी केली नाही, तर त्यांना अमेरिकेच्या अत्यंत विनाशकारी लष्करी कारवाईला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

ट्रम्प यांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल' या समाजमाध्यमावरून या घटनेची सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, आमच्या तीन जागतिक दर्जाच्या विनाशक नौकांनी गोळीबाराचा सामना करत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून अत्यंत यशस्वीपणे मार्गक्रमण केले. आमच्या जहाजांना साधा ओरखडाही लागला नाही, मात्र हल्ला करणाऱ्या इराणी सैन्याची आम्ही दाणादाण उडवली. इराणचे कमकुवत नौदल ज्या छोट्या बोटींच्या जीवावर उड्या मारत होते, त्या बोटी अमेरिकन सैन्याने पूर्णपणे उद्ध्वस्त केल्या आहेत. ही घटना अशा वेळी घडली आहे, जेव्हा जागतिक स्तरावर खनिज तेलाच्या वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'होर्मुझच्या सामुद्रधुनीत' तणावाचे वातावरण आहे. गेल्या काही काळापासून या सागरी मार्गावर अमेरिका आणि इराण यांच्यात सातत्याने संघर्ष पाहायला मिळत असून, दोन्ही देशांकडून एकमेकांवर हल्ले आणि प्रतिहल्ले सुरू असल्याच्या बातम्या समोर येत आहेत.

या हल्ल्याचे अत्यंत नाट्यमय वर्णन करताना ट्रम्प यांनी अमेरिकन संरक्षण यंत्रणेचे कौतुक केले. ते म्हणाले की, अमेरिकन जहाजांवर इराणकडून डागण्यात आलेली क्षेपणास्त्रे अमेरिकेने अत्यंत सहजतेने हवेतच निकामी केली. तसेच, इराणने पाठवलेले ड्रोनही हवेतच जाळून खाक करण्यात आले. या घटनेची खिल्ली उडवत ट्रम्प यांनी लिहिले की, ते ड्रोन आकाशातून थेट समुद्रात असे कोसळले, जणू एखादे फुलपाखरू मरून आपल्या थडग्यात पडत आहे.

# निदा खानला ११ मे पर्यंत पोलीस कोठडी

**नाशिक (प्रतिनिधी)** – टीसीएस प्रकरणातील आरोपी निदा खान हिला अखेर छत्रपती संभाजी नगरमधून अटक करण्यात आली. गेले २५ दिवस निदा खान पोलिसांना गुंगारा देऊन लपली होती. कोर्टाने तिचा जामीन नाकारल्यानंतर अखेर पोलिसांनी तिला शोधून काढले. तिच्यासोबत पाच जणांनाही अटक करण्यात आली आहे. आज पोलिसांच्या मोठ्या सुरक्षततेत तिला कोर्टात हजर करण्यात आले. दरम्यान ढउड प्रकरणातील आरोपी निदा खानला ११ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

टीसीएस (ढउड) प्रकरण उघड झाल्यानंतर निदा खानने नाशिक न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता, परंतु न्यायालयाने तिचा अर्ज फेटाळला होता. गर्भवती असल्याचं कारण देत तिने पुन्हा एकदा जमिनासाठी प्रयत्न केला होता, मात्र तिला अटकपूर्व जामीन मंजूर झाला नाही. अखेर मोठ्या प्रयत्नानंतर तिला आता पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणातील चार आरोपी रजा रफीक मेमन, तौसीफ बिलाल अत्तार, दानिश शेख आणि शाहरुख हुसैन शौकत कुरेशी यांना पोलिसांनी आधीच अटक केली होती. हे सर्व आरोपी सध्या तुरुंगात आहेत. परंतु या प्रकरणाची मास्टरमाईंड असलेली निदा खान मात्र फरार झाली होती. ती अनेक दिवस पोलिसांना गुंगारा देत होती.

# विना शिकवणी पेपर विक्रेत्याच्या मुलीने मिळविले शंभर टक्के गुण



**नाशिक (प्रतिनिधी)** – मनात जिद्द असेल तर आयुष्यातील कठोर प्रसंगांवरही मात करता येते. याचाच प्रत्यय नाशिकमध्ये आला आहे. आर्थिक परिस्थीवर मात करत पंचवटीतील एका १० विच्या विद्यार्थिनीने घवघवीत यश मिळवले आहे. प्रवास खडतर असला तरी मेहनतीच्या जोरावर यश मिळवता येते हे श्रावणीने दाखवून दिले आहे. श्रावणी हिने दहावीच्या परीक्षेत तब्बल १०० टक्के गुण मिळवत यशाचे शिखर गाठले आहे. सध्या सर्वच स्तरातुन तिचे कौतुक होत आहे.

पंचवटीतील मेरी म्हसरूळ परिसरातील रहिवासी आणि सीडीओ मेरी शाळेची विद्यार्थिनी श्रावणी महेश नांदुर्डीकर या विद्यार्थिनीने दहावी परीक्षेत १०० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे कोणतीही शिकवणी न लावता तिने हे यश मिळवले आहे. श्रावणी हिचे वडील पेपर विक्रेते असून त्यांची परिस्थिती ही बेताचीच आहे. मात्र परिस्थितीला कारण न बनवता तिने मेहनत घेतली, आणि मोठे यश मिळवले. तिच्या या यशाचा आई वडिलांना सार्थ अभिमान असून यशामुळे ते ही भारावून गेले.

जिद्द, संयम, चिकाटी आणि बेताची आर्थिक परिस्थिती असूनही श्रावणीने मिळवलेल्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. श्रावणीने सांगितले की सातत्यपूर्ण अभ्यास, आई-वडील आणि गुरुजनांचा आशीर्वाद तसेच सहकार्यामुळे हे यश मिळवता आले. पुढे १२ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेऊन इंजिनिअरिंग करण्याचा तिचा मानस आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर केवळ ज्ञानार्जनासाठी करावा, असे आवाहनही तिने केले आहे. तिच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधीतांना या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अतिया खातून मो. अब्दुल सत्तार, रा. आसरा नगर, कब्रस्तान जवळ, विमानतळ रोड, नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी खालील प्रमाणे जाहिर प्रगटन देत आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, मोहम्मद तौसीफ मोमीन यांना माझे आसरा नगर नांदेड येथील २ BHK चे ब्लॉक किरायाने म्हणून मोहम्मद तौफिक अन्सारी यांना राहण्यासाठी भाड्याने दिला होता पण ते मला मागील ४ महिन्यांपासून भाडे देत नव्हते दिनांक २८/०५/२०२६ रोजी घराचे भाडे मागितले असता मोहम्मद तौफिक अन्सारी व त्यांचे भाऊ वडील या सर्वांनी मिळून माझ्यासोबत शिवीगाळ केली व माझ्या मुलावर जीवघेणा हल्ला करून डोके फोडले त्या बाबत पोलीस ठाणे विमानतळ येथे दि.३०/०५/२०२६ तक्रार दिली आहे व त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे त्यानंतर दिनांक ०१/०५/२०२६ रोजी संध्याकाळी सुमारे ४:०० वा ते ५:०० वा च्य दरम्यान आपला समान घेऊन घर खाली करून निघून गेले त्याचे CCTV चे footage उपलब्ध आहेत, पण जाता जाता त्यांनी आम्हाला त्रास देण्याच्या हेतून सदर घरच्या रूमला त्याचं कुलूप लाऊन चाबी घेऊन गेले. व आपण दि.०१/०५/२०२६ पासून आज रोजी पर्यंत माझे पक्षकार फोने करून संपर्क करण्याचा प्रयत्न करत आहेत पण आपण प्रतिसाद देत नाहीत.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे आपणास कळविण्यात येते की आपण लावलेले कुलूप आपण आज पासून ३ दिवसाच्या आत थकीत भाडे देऊन व घराचा कुलूप खोलून घर माझ्या पक्षकाराच्या हवाली करून द्यावा अन्यथा माझे पक्षकारा हे सदर घरास लावलेला कुलूप उघडून सदर घर दुसऱ्या भाडेकरूस देतील व आपल्याविरुद्ध योग्य ती कायदेशीर कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी. या नंतर माझे पक्षकारा कशालाही जवाबदार राहणार नाहीत तसेच माझ्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी,

सबब हे जाहिर प्रगटन.

दिनांक :०८/०५/२०२६

मार्फत
स्वाक्षरीत/-
ॲड. आर.एस. पठाण
जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड

जाहीर प्रगटन देणार
स्वाक्षरीत/-
अतिया खातून मो. अब्दुल सत्तार
रा. आसरा नगर, कब्रस्तान जवळ,
विमानतळ रोड, नांदेड
मो.नं. ७८८८२२८४१६


# लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश

**मुंबई (प्रतिनिधी)** – नाशिक येथील नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत घडलेल्या 'कॉर्पोरेट जिहाद'नंतर राज्य सरकार 'अलर्ट मोड'वर आले असून, कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाला आळा घालण्यासाठी 'पॉश' (लैंगिक छळ प्रतिबंध) कायद्याची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या आस्थापना या नियमांचे उल्लंघन करतील, त्यांच्यावर दंडात्मक कारवाईसह परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाणार आहे.

महिला व बालविकास विभागाचे आयुक्त जगदीश मिनियार याबाबत माहिती देताना म्हणाले, दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या सर्व शासकीय आणि खासगी आस्थापनांमध्ये 'अंतर्गत तक्रार समिती' स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच या समितीची अधिकृत नोंद केंद्र सरकारच्या 'शी-बॉक्स' पोर्टलवर करणे अनिवार्य असेल. नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापना प्रमुखांविरुद्ध ५० हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. जर या त्रुटींची पुनरावृत्ती झाली, तर हा दंड दुप्पट केला जाईल किंवा थेट संबंधित संस्थेचा व्यावसायिक परवाना रद्द करण्याची टोकाची कारवाई केली जाणार आहे. राज्यातील अनेक खासगी कंपन्यांमध्ये अजूनही अशा समित्या कागदावरच असल्याने प्रशासनाने आता तातडीने नोंदणी करण्याचे आदेश दिले आहेत.


## टी.सी. हरवली

माझी रायवाडे मसणाजी वेंकटराव या नावाची बारावी पास कला शाखा टीसी व इतर कागदपत्रे मुखेड-नांदेड प्रवासात हरवले आहे. कृपया कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती.

- संपर्क पत्ता -
**रायवाडे मसणाजी वेंकटराव**
मु.पो.नारळी ता.कंधार जि.नांदेड

## टी.सी. हरवली

माझी राहीन सिद्धीकी या नावाची बी.एसस्सी. पासची टी. सी. रेल्वे स्टेशन ते देगलूर नाका ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. अमर कॉलनी, देगलूर नाका नांदेड-४३१६०२**
**मो.नं. ९९६०१८१२१२**

## Change In Name

My old Name is **MAROTI KOLI** which now I am changing as new Name **MAROTIRAO SHIRAM KOLI**. Henceforth, My all correspondence will be done As per my new Name. Please consider the same.

**: Address :**
**Tirupati Niwas, Gorakshan**
**Vishnu Nagar, Nanded**
**Mo.No. 9834575220**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटन देण्यात येते की मी नवनाथ पांडुरंग आबादार राहणार सावरगाव तालुका अर्धापूर जिल्हा नांदेड येथील रहिवासी असून मौजे सावरगाव तालुका अर्धापूर येथील गट क्रमांक १७ मधील झिरो हेक्टर ४५ आर शेती मी १२००००० रुपये बारा लाख रुपयास खरेदी केली आहे पंचासमक्ष बयाना म्हणून ३०००००/- (अक्षरी तीन लाख रुपये) दिले आहेत ज्याची चतुर सीमा खालील प्रमाणे आहे

पूर्वेस - सावरगाव कोंढा रस्ता, पश्चिमेस - भाऊराव नामदेव आबादार, दक्षिणेस - गोविंद किशन आबादार, उत्तरेस - भीमराव किशन आबादार

वरील चतुसिमा आतील जमीन विकत घेतली आहे सदरील शेती मी सौदाचिठी आधारे खरेदी केली आहे त्याबाबत कोणास अक्षेप उजर तक्रार असल्यास सात दिवसाच्या आत खालील पत्यावर संपर्क करावा त्यानंतर आलेला आक्षेप स्वीकारला जाणार नाही जाहीर

**प्रगटन देणार**
**नवनाथ पांडुरंग आबादार**
**रा. सावरगाव तालुका अर्धापूर जिल्हा नांदेड**
**मोबाईल नंबर ८९७५६३१८१७**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## विज ग्राहकांना आवाहन

भोकर विभागातील सर्व विज ग्राहकांना आवाहन करण्यात येते की, महावितरण भोकर विभाग पुर्नररचना केल्या नंतर ग्राहकांच्या सेवेसाठी खालील नमूद केलेल्या परिसरामध्ये / शाखा अंतर्गत विज पुरवठा संदर्भात तक्रार / माहिती जाणून घेण्यासाठी महावितरण टोल फ्री क्रंमाक १८००२३३३४३५, १८००२१२३४३५ व १९१२ (ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण करण्यासबंधिचे नियम व कार्यपध्दती महावितरणच्या संकेत स्थळ: www.mahadiscom.in> Consumer Portal CGRF यावर उपलब्ध आहे.) वर आपली तक्रार नोंदवावी सदर टोल फ्री क्रमांक २४X७ सुरु असतो. तसेच आपतकालीन परिस्थतीमध्ये सबंधित शाखा कार्यालयाचे फयूज क्रमांकावर आपली तक्रार नोंदवावी. तसेच टोल फ्री क्रमांक व फयूज सेंटर वरील क्रमांकावरुन आपले समाधान न झाल्यास शाखा कार्यालयाचे प्रधान तंत्रज्ञ यांना संपर्क करावा तद्नंतर सुध्दा आपले समाधान न झाल्यास शाखा अभियंता पॉवर सप्लाय यांच्याकडे तक्रारीच्या समाधानाकरीता संपर्क साधून संपूर्ण माहिती कळवावी.

| अ. क्रं. | शाखा / युनिटचे नांव | समाविष्ट क्षेत्र किंवा लगतचे क्षेत्र/ परिसर | फयूज कॉल/ तक्रार निवारण सेंटर मोबाईल क्रमांक | युनिट/ शाखा प्रधान तंत्रज्ञ मोबाईल क्रमांक | पॉवर सप्लाय / शाखा अभियंता मोबाईल क्रमांक | उप कार्यकारी अभियंता यांचा मोबाईल क्रमाक |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | भोकर (शहर) शाखा | संपूर्ण भोकर शहर | ७८७५४८६१४० | ७८७५४८६१३९ | ७८७५७६४८३९ | उप कार्यकारी अभियंता उप विभाग भोकर यांचा मोबाईल क्रमांक ७८७५७६४८३१ |
| ०२ | भोकर (ग्रामीण) शाखा | भोकर ग्रामीण परिसर | – | ७८७५४८८११३ | ७८७५४८६११६ | |
| ०३ | सोनारी शाखा | सोनारी शाखा व लगतची गांवे | – | – | ७८७५७६४८७८ | |
| ०४ | किनी शाखा | किनी शाखा व लगतची गांवे | – | | ७८७५७६४८६२ | |
| ०५ | उमरी-१ शाखा | संपूर्ण उमरी शहर | | | ७८७५७६४८४२ | उप कार्यकारी अभियंता उप विभाग उमरी यांचा मोबाईल क्रमांक ७८७५७६४८३५ |
| ०६ | उमरी-२ शाखा | उमरी-२ शाखा व लगतची गांवे | – | ७८७५४८५५५६ | ७८७५७६०७६७ | |
| ०७ | गोळेगांव शाखा | गोळेगांव शाखा व लगतची गांवे | – | ७८७५४८८२६४ | ७८७५७६४८७९ | |
| ०८ | हिमायतनगर शहर शाखा | संपूर्ण हिमायतनगर शहर | – | ९१६९६९६३५० | ७८७५७६४८५२ | उप कार्यकारी अभियंता उप विभाग हिमायतनगर यांचा मोबाईल क्रमांक ७८७५७६४९१२ |
| ०९ | हिमायतनगर ग्रामीण शाखा | हिमायतनगर ग्रामीण शाखा व लगतची गांवे | – | – | ७८७५७६४८७३ | |
| १० | सरसम शाखा | सरसम शाखा व लगतची गांवे | – | – | ७८७५७६४८४७ | |
| ११ | इस्लापूर शाखा | इस्लापूर शाखा व लगतची गांवे | – | ७८७५४८२६५९ | ७८७५७६४८५३ | |
| १२ | हदगांव शहर शाखा | संपूर्ण हदगांव शहर | ७८७५७६४८६१ | – | ७८७५४८९२२० | उप कार्यकारी अभियंता उप विभाग हदगांव यांचा मोबाईल क्रमांक ७८७५७६४८३२ |
| १३ | हदगांव ग्रामीण शाखा | हदगांव ग्रामीण शाखा व लगतची गांवे | – | – | ७८७५७६४८५१ | |
| १४ | तामसा शहर शाखा | संपूर्ण तामसा शहर | – | ७८७५४८७१७३ | ७८७५७६४८४६ | |
| १५ | तामसा ग्रामीण शाखा | तामसा ग्रामीण शाखा व लगतची गांवे | – | ७८७५४८९१५१ | ७८७५४८६८९० | |
| १६ | मनाठा शाखा | मनाठा ग्रामीण शाखा व लगतची गांवे | – | ७८७५४८७००३ | ७८७५४८९२२० | |
| १७ | तळणी शाखा | तळणी ग्रामीण शाखा व लगतची गांवे | – | ७८७५७६४९११ | ७८७५७६४८५१ | |
| १८ | निवघा शाखा | निवघा ग्रामीण शाखा व लगतची गांवे | – | – | ७८७५४८९५५२ | |
| १९ | आष्टी शाखा | आष्टी ग्रामीण शाखा व लगतची गांवे | – | – | ७८७५७६४९२२ | |
| २० | किनवट शहर शाखा | संपूर्ण किनवट शहर | ७८७५४८८५४९ | – | ७८७५७६४८५४ | उप कार्यकारी अभियंता उप विभाग किनवट यांचा मोबाईल क्रमांक ७८७५७६४८३४ |
| २१ | किनवट ग्रामीण-१शाखा | किनवट ग्रामीण -१ शाखा व लगतची गांवे | – | – | ७८७५७६४८९० | |
| २२ | किनवट ग्रामीण-२शाखा | किनवट ग्रामीण -२ शाखा व लगतची गांवे | – | ७८७५४८७२९८ | ७८७५७६४८३३ | |
| २३ | मांडवी शाखा | मांडवी शाखा व लगतची गांवे | – | ७८७५४८७५०२ | ७८७५७६४८७५ | |
| २४ | सारखणी शाखा | सारखणी शाखा व लगतची गांवे | – | ७८७५४८२९९७ | ७८७५७६४९२६ | |
| २५ | बोथरोड शाखा | बोथरोड शाखा व लगतची गांवे | – | ७८७५४८५६३२ | ७८७५७६४८५५ | |
| २६ | माहूर शाखा | संपूर्ण माहूर शहर | – | ७८७५४८६८९८ | ७८७५४८९६८५ | उप कार्यकारी अभियंता उप विभाग माहूर यांचा मोबाईल क्रमांक ७८७५७६४८३७ |
| २७ | वाई शाखा | वाई शाखा व लगतची गांवे | – | – | ७८७५७६४८७६ | |

स्वाक्षरी/-
कार्यकारी अभियंता, महावितरण भोकर विभाग
भ्रमणध्वनी क्रंमाक (७८७५७६४४०७)

PRO No. 023 Dt. 07.05.2026

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१९०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद

## मान्यवरांच्या हस्ते शिबिरात विविध दाखले व प्रमाणपत्राचे वितरण

**नांदेड(प्रतिनिधी)**–शासनाच्याविविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ सर्व–सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन तरोडा बु. मंडळातील पासदगाव येथे राधेश्वरी मंगल कार्यालयात करण्यात आले. या शिबिरास नागरिकांनी प्रतिसाद देत विविध योजनांची माहिती घेऊन लाभ मिळविला.

या शिबिरास नांदेड उत्तर मतदारसंघाचे आमदार बालाजी कल्याणकर उपस्थित होते. तसेच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड, तालुका कृषी अधिकारी चातरमल, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण मुंडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मंडळातील विविध गावांचे सरपंच व इतर पदाधिकारीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना आमदार बालाजी कल्याणकर यांनी शासनाच्या विविध योजना व उपक्रम नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अशा शिबिरांची आवश्यकता असल्याचे सांगितले. महसुली कामे तत्काळ मार्गी लागत असल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत असून, शासन आपल्या दारी ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान अंतर्गत महसूल, कृषी, आरोग्य, ग्रामविकास, महिला व बालकल्याण, विशेष सहाय्य, भूमी अभिलेख, नोंदणी व मुद्रांक, निवडणूक विभाग तसेच आपले सरकार सेवा केंद्र यांच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार संजय वारकड यांनी केले. त्यांनी शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देत नागरिकांना योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या शिबिरामध्ये सातबारा व ८–अ चे एकूण ७४८ दाखले वितरित करण्यात आले. तसेच उत्पन्न, रहिवासी, वय, जातीचे तसेच अल्पभूधारक प्रमाणपत्र आदी मिळून एकूण ७९९ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत ६ लाभार्थ्यांना मंजुरी प्रमाणपत्र देण्यात आले. एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत लाभार्थ्यांना बेबी केअर किटचे वितरण करण्यात आले. तसेच सलोखा योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या गट अदलाबदलीद्वारे सातबाराचे वितरण करण्यात आले.

# ‘स्वारातीम’च्या विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील उद्योगाभिमुख प्रशिक्षणाची संधी



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या गणितीयशास्त्रे संकुलातील विद्यार्थ्यांनी मॅथेमॅटीक्स फॉर आर्टीफिशियल इंटेलिजन्स या विषयावरील ऑन–द–जॉब ट्रेनिंग कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला. स्कील फॅक्टरी लर्निंग प्रा. लि. यांच्या सहकार्याने आयोजित या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना पायथन प्रोग्रामिंग, मशीन लर्निंग, डेटा विश्लेषण आणि सिमेंटिक शोध यांसारख्या विषयांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.

कार्यक्रमाचा समारोप एथॉन एआय सोल्युशन्समधील एआय सोल्यूशन्स आर्किटेक्ट राहुल लक्ष्मण तेमकर यांच्या विशेष कार्यशाळेने झाला. त्यांनी विद्यार्थ्यांना मल्टी–एजंट एआय प्रणाली, एमएलओपीएस आणि एलएलएम आधारित तंत्रज्ञानाची माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या पाठिंब्याबद्दल आयोजकांनी आभार व्यक्त केले.

यावेळी ऑन–द–जॉब ट्रेनिंग मार्गदर्शक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक अनुभवाचे महत्त्व अधोरेखित केले. तर नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एस. जे. वाधेर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. गणितीय–शास्त्रे संकुलाच्या संचालिका डॉ. रुपाली एस. जैन यांनी एआय आणि डेटा सायन्स क्षेत्रातील उद्योगसंस्थांसोबत सहकार्य वाढवून अशा प्रशिक्षण उपक्रमांना अधिक बळकटी देण्यात येणार असल्याचे सांगितले.

## नांदासौख्यभरे

### रावळकर–सिंधीकुमठे

नांदेड येथील रहिवासी अविनाश विठ्ठलराव रावळकर यांची भाच्ची व स्व. विठ्ठलराव रावळकर यांची नात चि. सौ. कां. याज्ञिका यांचा शुभविवाह चाकूर तालुक्यातील नागेशवाडी येथील रहिवासी गणपतराव सिंधीकुमठे यांचे कनिष्ठ सुपुत्र चि. रवीराज यांजसमवेत शनिवार, दि. ९ मे २०२६ रोजी सायंकाळी ६.३५ वाजता आशीर्वाद गार्डन काबरानगर रिंगरोड येथे संपन्न होत आहे. त्यानिमित्त वधू–वरांस आगामी वैवाहिक जीवनास हार्दिक शुभेच्छा!

–मुख्यसंपादक

# ‘प्रशासन लोकांच्या दारी’ हीच आमची भूमिका –उपविभागीय अधिकारी मेंगशेट्टी

**भोकर (प्रतिनिधी)** –सामान्य नागरिकांना त्यांच्या हक्काच्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, तर प्रशासन स्वतः लोकांच्या दारी जाऊन त्यांच्या समस्या सोडवेल हीच आमची मुख्य भूमिका आहे, असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर’ मोहिमेंतर्गत शुक्रवार, दि. ८ मे २०२६ रोजी नगर परिषद सभागृहात भोकर महसूल मंडळ आयोजित या शिबिराच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, तहसीलदार विनोद गुंडमवार, निवासी तहसीलदार अभयराज नंजुंडे, मुख्याधिकारी ऋषभ पवार, तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव, उपनगराध्यक्ष दिलीप सोनवडे व सर्व नगरसेवक, प्रतिनिधी उपस्थित होते.

मेंगशेट्टी पुढे म्हणाले की, राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणारे हे समाधान शिबीर म्हणजे पारदर्शक प्रशासनाचे एक पाऊल आहे. जिवंत सातबारा, उत्पन्न प्रमाणपत्र असो, वा रेशन कार्ड, ही कागदपत्रे वेळेत मिळणे हा नागरिकांचा अधिकार आहे आणि तो अधिकार विनाविलंब मिळवून देणे हेच आमचे कर्तव्य आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना व लाभार्थ्यांना मार्गदर्शन करताना तहसीलदार विनोद गुंडमवार म्हणाले की, महाराजस्व समाधान शिबीर हे केवळ कागदपत्रांचे वाटप करण्याचे केंद्र नसून, सर्व–सामान्य जनतेच्या अडीअडचणी जागेवरच सोडवण्याचे एक हक्काचे व्यासपीठ आहे. महसूल विभागासह तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयांच्या योजना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. अनेकदा कागदपत्रांच्या तांत्रिक त्रुटींमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय लाभापासून वंचित राहावे लागते. या शिबिराच्या माध्यमातून आम्ही जास्तीत जास्त अर्ज निकाली काढण्यावर भर दिला आहे. मग तो जिवंत सातबाराचा प्रश्न असो, संजय गांधी निराधार योजनेचे उत्पन्न प्रमाणपत्र असो, वा रेशन कार्डातील दुरुस्ती, नागरिकांनी निर्भयपणे पुढे येऊन आपल्या समस्या मांडाव्यात; त्यांना विनाविलंब सेवा देणे हे आमचे कर्तव्य आहे. या शिबिरामध्ये मान्यवरांच्या हस्ते विविध विभागांमार्फत लाभार्थ्यांना लाभाचे वाटप करण्यात आले. महसूल व पुरवठा विभाग जिवंत सातबारा, भोगवटादार २ चे १ मध्ये रूपांतरण, उत्पन्न प्रमाणपत्र आणि नवीन रेशन कार्डांचे वाटप करण्यात आले. कृषी व महिला बालविकास: शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व अवजार बँक प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले, तर गरोदर मातांना ‘बेबी किट’ देऊन सन्मानित करण्यात आले. नगर परिषद, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे व आरोग्य सुरक्षेसाठी आयुष्मान कार्डांचे वाटप करण्यात आले.

उद्घाटक नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांनी नगर परिषदेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध जनहितकारी योजनांची माहिती दिली. या कार्यक्रमा–साठी भोकर महसूल मंडळाचे मंडल अधिकारी म नोजकुमार खंदारे, ग्राम महसूल अधिकारी अनिल मुनेश्वर, असोले, सूर्यवंशी, कवानकर, उबाळे आणि श्रीमती भुरके, डॉ. अंकिता केंद्रे, एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या वंदना राव यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांगवीतील छत्रपती संभाजी चौकात महावितरणच्या ट्रान्सफॉर्मरचा कब्जा

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या सांगवी विमानतळ परिसरातील राजे छत्रपती संभाजी महाराज यांच्या नियोजित पुतळ्याच्या जागेत महावितरणने रातोरात ट्रान्सफॉर्मर बसविला. विशेष म्हणजे ट्रान्सफॉर्मर बसविण्यामागे या भागात विजेचे भारनियमन होऊ नये हा उद्देश जरी चांगला असला तरी जी जागा निवडली ती छत्रपती संभाजी राजे यांच्या पुतळ्यासाठी नियोजित आहे. त्या ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसविणे म्हणजे अपघाताला निमंत्रण देणे होय.



या भागातील महानगर पालिकेतील लोकप्रतिनिधी, भाजपाचे पदाधिकारी यांनी या भागाला नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात यावा अशी मागणी लावून धरली होती व ती मान्य करून महावितरण कंपनीने ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून दिला. मात्र ज्या परिसरात ट्रांसफार्मर लावायला पाहिजे होता तेथे न लावता छत्रपती संभाजी राजे यांच्या नियोजित पुतळा परिसरात लावल्यामुळे राजांच्या चाहत्यांमध्ये महावितरणच्या या भूमिकेविषयी चीड निर्माण झाली आहे.

याबाबत महावितरण कंपनीने संबंधित लोकप्रतिनिधी व पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून हा ट्रान्सफॉर्मर बसवायला हवा होता, परंतु तो रातोरात कामगार पुतळ्याच्या ठिकाणी बसविला. बसविलेला ट्रान्सफॉर्मर तातडीने काढून बाजूलाच असलेल्या मोकळ्या भूखंडावर बसवावा अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा छत्रपती संभाजीराजे यांचे चाहते, भाजपा पदाधिकारी आणि छावा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

# नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसाय विरोधी मोहिमेत ३३५ गुन्ह्यांमध्ये २ कोटी २० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)** – १ ते ३१ मे, २०२६ दरम्यान, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा, मटका/जुगार, अवैध दारू विक्री, शस्त्र अधिनियम व इतर कलमान्वये अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्याचे निश्चित केले आहे.

या मोहिमेअंतर्गत, दि. १ ते ७ मे, २०२६ दरम्यान संपलेल्या पहिल्या आठवड्यात नांदेड परिक्षेत्रात गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहितेअंतर्गत ७, महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ८२, महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये १९६ व शस्त्र अधिनियम अन्वये १९, तर इतर अधिनियमाखाली ३१ अशा एकूण ३३५ कारवाया करून ४७० इसमांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून २ कोटी २० लाख ९१ हजार ९४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परिक्षेत्रात गुटखा, मटका/जुगार, दारु, शस्त्र अधिनियम व इतर कलमान्वये अवैध व्यवसाय विशेष मोहीम ही पुढील आठवड्यात आणखी व्यापकपणे राबविण्यात येणार आहे.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली ‘खबर’ नावाची हेल्पलाईन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेजद्वारे पाठवावी, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

# गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त मान्यवरांचे अभिवादन

**कंधार (प्रतिनिधी)** –कंधार तालुक्यातील चिखली येथे आ. तथा विधिमंडळ उपविधान समितीचे समिती प्रमुख प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे वडील शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्या ९ व्या पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन करण्यात आले.



यावेळी निवृत्त न्यायाधीश एम. जी. गायकवाड, माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, माजी आ. मोहनराव हंबर्डे, माजी आ. सुभाषराव साबणे, माजी आ. अविनाशराव घाटे, प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, प्रवीण पाटील चिखलीकर, सुरजितसिंग गिल, माजी नगरसेवक संदीप पाटील चिखलीकर, माधव पावडे, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष शेख करीम, कंधार नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, लोहा नगरपालिकेचे गटनेते भास्कर पवार, कंधार नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष स्वप्नील पाटील लुंगारे, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे नगरसेवक साबेर चाऊस, नगरसेवक हबीब बावजीर, लोहा नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक केशवराव मुकदम, श्रीमती चित्राताई लुंगारे, विनायकराव पाटील शिंदे, मांजरमकर, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशराव पाटील सावळे, हंसराज पाटील बोरगावकर, चिखलीचे माजी सरपंच सचिन पाटील चिखलीकर, बालाजी शिंदे, ॲड. जमीन पटेल, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, सुरेश गुट्टे, बालाजी पाटील सावरगाव, कंधार नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष जफर खान, नगरसेवक अविनाश पवार, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, केतन खिल्लारे, नगरसेवक सतीश निखाते, नगरसेवक सदानंद तेलंग, नगरसेवक तुकाराम दाढेल, नगरसेवक पंकज परिहार, संजय भोसीकर, उदय चव्हाण, बाबुराव कदम, मोसीनखान पाठाण यांची उपस्थिती होती.

# कृष्णाबाई ठाकूर यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील स्वागतनगर येथील ज्येष्ठ नागरिक श्रीमती कृष्णाबाई गणेशसिंह ठाकूर (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने दि. ८ मे रोजी दुपारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ८ वा. गोवर्धनघाट शांतीधाम स्मशान–भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. महेंद्रसिंह ठाकूर यांच्या त्या मातोश्री होत.



# महात्मा फुले शाळेचा ९८.७१ टक्के निकाल

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा–तर्फे शुक्रवारी जाहीर झालेल्या दहावी परीक्षेच्या निकालात शहरातील बाबानगर येथील महात्मा फुले शाळेने उज्ज्वल यश संपादन केले आहे. शाळेचा एकूण निकाल ९८.७१ टक्के लागला असून विशेष प्राविण्यासह २३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

निकालामध्ये प्रथम श्रेणीत १४९, द्वितीय श्रेणीत ६३ तर तृतीय श्रेणीत १८ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. तसेच ९० पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या ५२ विद्यार्थ्यांनी शाळेच्या गुणवत्तेच्या परंपरेत भर घातली आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गुणवत्तेचा टक्का वाढवण्यात महात्मा फुले शाळेला यश आले असून, विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष खासदार तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, उपाध्यक्ष अमिता चव्हाण, सचिव माजी मंत्री डी. पी. सावंत, सहसचिव डॉ. रावसाहेब शेंदारकर, कोषाध्यक्ष ॲड. उदय निंबाळकर, कार्यकारी संचालक नरेंद्र चव्हाण, पांडुरंग पावडे, कार्यकारिणी सदस्या श्वेता पाटील, मुख्याध्यापिका एस. आर. कदम, उपमुख्याध्यापक अरुण कल्याणकर, पर्यवेक्षक एस. व्ही. जाधव, डी. एल. खानझोडे, डी. एस. खंदारे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# अनैतिक संबंधातून खून प्रकरणी दोघांना जन्मठेपेची शिक्षा


**नांदेड (प्रतिनिधी)** –अनैतिक संबंधातून शहरामध्ये घडलेल्या एका खून प्रकरणात सत्र न्यायाधीश आर. व्ही. कोकरे यांनी दोन आरोपींना जन्मठेप व प्रत्येकी ६५ हजार रुपये म्हणजेच एकूण १ लाख ३० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा शुक्रवार, दि. ८ मे रोजी ठोठावली.

श्रीरंग पिराजी पवार यांचा मुलगा तुषार श्रीरंग पवार (वय १९) किनवट हा शिक्षणासाठी नांदेडला भाग्यनगर परिसरात राहत होता. दि. ७ डिसेंबर २०१९ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास तो घरातून बाहेर पडला होता. मात्र तो परतलाच नाही. कुटुंबियांनी शोधाशोध करूनही काहीच माहिती न मिळाल्याने १० डिसेंबर २०१९ रोजी पोलीस ठाण्यात तो बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती.

तपासाची सूत्रे हातात घेतल्यानंतर पोलीस अंमलदार प्रकाश मुंढे यांनी तुषारच्या मोबाईल कॉल डिटेल्सची तपासणी केली. त्यात शेवटचा फोन त्याच गावातील दिलीप बळीराम मिटकर याचा असल्याचे समोर आले. चौकशीदरम्यान दिलीपने सुरुवातीला अनभिज्ञता दर्शवली. मात्र पोलिसांनी तपासाची दिशा बदलत परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आणि तपासाला निर्णायक वळण मिळाले.

एका मंदिराजवळील सीसीटीव्ही फुटेज–मध्ये ७ डिसेंबर रोजी दुपारी तुषार पवार हा दिलीप मिटकर आणि विजय जाधव यांच्यासोबत जाताना दिसला. तेथे असलेल्या एका घराजवळील दृश्यांमध्ये काही वेळाने दिलीप आणि विजय हे दोघे रंगाच्या पोत्यामध्ये अवजड वस्तू बांधून बाहेर आणताना आढळले. ते पोते खाली पडल्याचेही फुटेजमध्ये स्पष्ट दिसत होते. याच घटनेमुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला.

सखोल चौकशीत आरोपींनी अखेर गुन्ह्याची कबुली दिली. दिलीप मिटकर याला संशय होता की, त्याच्या पत्नीचे तुषारशी अनैतिक संबंध आहेत. या संशयातूनच त्याने विजय जाधवच्या मदतीने तुषारचा खून केल्याचे उघड झाले. खून केल्यानंतर मृतदेह पोत्यात बांधून वाहन क्रमांक (एम एच–०५ बीके– ३८४३) द्वारे काकांडी परिसरातील शिवारात टाकण्यात आल्याची माहिती आरोपींनी दिली. सांगितलेल्या ठिकाणी शोध घेतला असता पोत्यात तुषार पवार याचा मृतदेह आढळला. मृतदेहाचे हात–पाय बांधलेले होते. तसेच त्याची शाळेची बॅगही घटनास्थळी सापडली. यानंतर भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३८१/२०१९ अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सहायक पोलीस निरीक्षक विशाल भोसले आणि पोलीस अंमलदार मुसळे यांनी तपास करत दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. न्यायालयात हा खटला ७७/२०२० प्रमाणे सुरु झाला. या खटल्यात एकूण २५ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड. रणजित देशमुख यांनी मोबाईल कंपन्यांच्या अधिकाऱ्यांची साक्ष सादर करून आरोपी व मृतामधील सततचा संपर्क सिद्ध केला.



जरी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेला साक्षीदार नसला तरी सरकारी पक्षाने परिस्थितीजन्य पुराव्यांच्या प्रत्येक कडीला मजबूतपणे जोडले. शेवटचा संपर्क, सीसीटीव्ही पुरावे, कॉल रेकॉर्ड, मृतदेहाचा शोध आणि आरोपींचे वर्तन या सर्व बाबींचा परस्पर संबंध न्यायालयासमोर स्पष्ट करण्यात आला.

या सर्व पुराव्यांचा बारकाईने अभ्यास करून न्यायाधीश आर. व्ही. कोकरे यांनी आरोपी दिलीप बळीराम मिटकर (वय २१) आणि विजय भोजू जाधव (वय २०) यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप व प्रत्येकी ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तसेच मृतदेहाची विल्हेवाट लावल्याबद्दल कलम २०१ अंतर्गत ७ वर्षांची शिक्षा व १० हजार रुपये दंड, तर खुनाचा कट रचल्याबद्दल कलम १२० (ब) अंतर्गत दोन वर्षांची सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली. भाग्यनगरचे पोलीस निरीक्षक तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार बसलिंग कोळनुरे यांनी पैरवी अधिकाऱ्याचे काम पाहिले. सरकार पक्षाच्यावतीने जिल्हा सरकारी वकील रणजित एन. देशमुख यांनी भक्कमपणे बाजू मांडली.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com